म. ... वाचनालय, ठाणे.

विषय ....

दा. क्र.

IRBK-0120594

IRBK-0120594

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०५९८ नों. दि २।११।०८
वि. आत्मक क्र.

७
वाचनालय नाटक
२०५८४
२११।८४

# खोल....खोल पाणी

रत्नाकर मतकरी

IRBK-0120594
IRBK-0120594

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे,
मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव, मुंबई ४०० ००४.

मुद्रक :
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

© सौ. प्रतिभा मतकरी,
राधानिवास,
टिळक रोड, दादर,
मुंबई ४०० ०१४.

पहिली आवृत्ती :
डिसेंबर १९८३

मुखपृष्ठ :
सुप्रिया मतकरी

मूल्य :
१५ रुपये

DRM No. 885 / 1983

ओठांमधले दूध अजून ओलसर आहे...
पण ओठांवरती भुरी लव कधीही उगवेल.
सुरवंटाचा कोष अजून भंगलेला नाही....
तरी फुलपाखरू केव्हाही अलगद बाहेर पडेल.
पहाट फुटेल, आता कोणत्याही क्षणी,
अशा मंतरलेल्या वेळी होतात नव्या जाणिवा मनाच्या.
मुख्य म्हणजे देहाच्या.
देह होतो एक तंतुवाद्यच.
ज्याला स्पर्श करताच जागे होतात नवे अनोळखी सूर.
लोभवणारे...भुलवणारे...

नवे अनुभव असतात गडद...काळे...घाबरवणारे
आणि तरीही असते इच्छा...
मखमालीला एकदाच स्पर्श करण्याची.
शरीर असते आपले स्वतःचेच
आणि तरीही बंड पुकारते आपल्याशीच,
तेव्हा समजेनासा होतो अर्थ अवघ्या आयुष्याचाच.
वाटते, आत्ता तर सारे सोपे होते...
कशी झाली एवढ्यात गुंतागुंत ?
आत्ता तर होते पाणी पाऊलभर...
कसा झाला त्याचा डोह भीषण ?
जितक्या नव्या रीती शोधाव्यात,
तितकी गणिते चुकतात.
उत्तरे लपून बसतात...
काळ्या डोहाच्या खोल खोल पाण्यात.

'खोल....खोल पाणी' या नाटकाचा पहिला प्रयोग, 'कलारंग' या संस्थेतर्फे, सोमवार दि. २२ ऑगस्ट १९८३ रोजी रात्री ८–३० वाजता, शिवाजी मंदिर, दादर येथे झाला.

दिग्दर्शन : कमलाकर सारंग

नेपथ्य : बाबा पार्सेकर
प्रकाशयोजना : बाबा आंबेरकर
पार्श्वसंगीत : अजित मर्चंट
ध्वनि–संकेत : नरेश गुजराती
रंगभूषा : श्रीकृष्ण खोले
रंगमंच–व्यवस्था : गफूरभाई आणि सहकारी
निर्मिती : लालन सारंग

**भूमिका :**

राजाभाऊ : कमलाकर सारंग
राजा : विराज चिटणीस
बाळ : देवेन्द्र सारळकर
बामन्या : राकेश सारंग
लक्ष्मण : राजा नाईक
नाना : कमलाकर सारंग
चंद्राक्का : लालन सारंग
आई : अमिता खोपकर
बाळकू : चंदू पारखी
मथूआत्या : माया गुर्जर

*

स्थळ : नाशिकमधील, दुमजली वाड्याची बैठकीची खोली, व माडीवरील एका खोलीचा काही भाग.
सर्व घटना याच ठिकाणी घडतात.

अंक १ : प्रवेश १ : पावसाळ्यातील एक संध्याकाळ ते रात्र.
प्रवेश २ : तीन दिवसांनी, संध्याकाळी.
अंक २ : प्रवेश १ : दोन वर्षांनी, एका दुपारी.
प्रवेश २ : काही दिवसांनी, शनिवारी संध्याकाळी.
अंक ३ : प्रवेश १ : दुसऱ्या दिवशी, रविवारी सकाळी.
प्रवेश २ : त्याच संध्याकाळी.
प्रवेश ३ : काही दिवसांनी, संध्याकाळी.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०५८४ नों. दि. २।११।८४
वि. नाटक क्र.

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ अंधूक प्रकाशात, एक मध्यमवयीन गृहस्थ दिसतो. एका ऐसपैस, हातवाल्या, जुन्या पद्धतीच्या इझीचेअरमध्ये बसलेला. त्यांच्या डोळ्यांवर चश्मा, ओठांत सिगार. ]

गृहस्थ : मी राजाभाऊ. आचवलांच्या कुटुंबातला मी थोरला मुलगा, म्हणून राजा. तशी माझ्याहून मोठी एक मुलगी होती. ताई. तिच्यामाझ्यांत खूपच अंतर. म्हणजे किती? तर मला नुकती समज यायला लागली होती, तेव्हा तिचं लग्नसुद्धा होऊन गेलं होतं. तिच्यानंतरची मधली भावंडं गेली, मी वाचलो. माझ्या पाठीमागचा बाळ. बाळनंतरच्या बाळंतपणात आईला खूप त्रास झाला. मुलगी झाली, ती तिसऱ्या दिवशी गेली. आणि आईला जो बाळंतरोग लागला, त्यात चार-पाच महिन्यांनी आईसुद्धा गेली. आमच्या नाशकातल्या दुमजली वाड्यात राहिलो, आम्ही फक्त तिघेच. नाना, मी अन् बाळ. तसे नोकरचाकर होते, पण घरचे आम्ही तिघेच. तिघे तरी कसे? चंद्राक्का होती ना! तिला घरच्यांत धरायची, की नोकरमंडळींत, कोण जाणे! कारण तसं पाहिलं, तर ती ना आमच्या नात्याची, ना गोताची! पण आम्ही आईवेगळी लहान मुलं. आमच्याकडे पाहायला घरात कुणी बाई-माणूस हवं, म्हणून तिला आणून ठेवलं— आणि हळूहळू ती घरात सामावूनच गेली....

वेळ, हे सगळं आठवतं, नानांच्या या खुर्चीत बसलं, की. नाना गेले, त्याला आता, नाही म्हटलं, तरी पस्ती. .स....हो, पस्तीसच वर्षं उलटली. म्हणजे बघा, मी न् बाळच पन्नाशीला आलो की आता. नाना गेलेच! आणि चंद्राक्का....? ती कुठं आहे, कुणास ठाऊक! हयात तरी आहे, की नाही, काय माहीत? पण हा आमचा नाशकातला वाडा मात्र, आम्ही अजून राखून ठेवलाय्. सुट्टीत पोरं-

विरं येतात, गजबजून जातो. पण एरवी रिकामाच असतो. सगळी-कडे धुळीची पुटंच्या पुटं चढतात. बरंचसं सामान आम्ही काढून टाकलं. पण नानांची ही खुर्ची– ही मात्र अजून जपून ठेवलीय्. नानांची आठवण, म्हणून ! या खुर्चीत असं नानांसारखं बसलं, की त्या वेळच्या आठवणी यायला लागतात, आणि अनेक प्रश्नांचं वादळ मनात घोंगावू लागतं. वाटतं, ज्याला आपण नीती–नीती म्हणतो, ते खरं असतं तरी काय ? झालंच तर, आपली नीतीची कल्पना आपण दुसऱ्या माणसावर लादू शकतो का ? आपल्याला तो अधि-कार तरी असतो का ?

हे प्रश्न आता पडलेत. पण तेव्हा मी लहान होतो. फार लहान होतो. जेमतेम तेरा–चौदा वर्षांचा. मला काहीच कळत नव्हतं. आज कळतं...तरीही प्रश्नांची उत्तरं मात्र मिळत नाहीत....म्हणून वाटतं, की हे प्रश्न कुणापुढं तरी ठेवावेत....आणि मन मोकळं करावं....

[ रंगमंच उजळत जातो...काळ पस्तीस वर्षं मागे जातो.... रंग-मंचावर दिसतात, नाशिकमधल्या एका प्रशस्त वाड्याची बैठकीची खोली आणि माडीवर जाणारा जिना. शिवाय, पुढील भागात, अधूनमधून, नानांची माडीवरची खोलीही दृष्टीस पडते.

मुख्य दरवाज्याबाहेर, प्रेक्षकांना न दिसणारी, हातपाय धुवायची मोरी, पायऱ्यांच्या बाजूला. तीन–चार पायऱ्या चढून आल्या-नंतर लागणारा ठेंगणा मुख्य दरवाजा. दोन–तीन ठेंगण्याच खिडक्या. स्वैंपाकघर आणि इतर खोल्या, यांना जोडणारी दारं. बैठकीची खोली एकूण टापटीप आहे. भिंतीवर एखाददोन सुभाषितं, राम-पंचायतनाचं चित्र, भरलेलं नक्षीकाम वगैरे. कोपऱ्यात, लिहिण्याचं बसकं डेस्क, एक–दोन साध्या खुर्च्या. बसण्यासाठी, नीट अंथरलेल्या स्वच्छ, पांढऱ्या बैठका. छोटं, स्टूलवजा टेबल, त्यावर फुलदाणी, तिच्यात दारातल्या कर्दळीची फुलं.

माडीवरच्या, नानांच्या खोलीत, एक मोठं फडताळ, नानांचं टेबल, त्यावर थोडीफार वृत्तपत्रं, मासिकं, चार–दोन फायली आणि वर उल्लेखिलेली प्रशस्त आर्मचेअर. या खोलीचा फक्त अर्धाच भाग दृष्टिपथात येणारा.

वेळ दिवेलागणीची.

राजा, बाळ आणि त्यांचा दोस्त वामन्या असे तिघे खो खो हसत बाहेरून आत येतात. राजा तेरा वर्षांचा आणि बाळ अकरा. वामन्या राजाच्या बरोबरीचा. आत येताच, तिघेही, एकमेकांकडे पाहून नुसते खुः खुः हसत बसतात. बोलत मात्र काहीच नाहीत. थांबून थांबून हसत राहतात.
राजाभाऊ काही क्षण त्या तिघांकडे पाहत राहतात, मग निघून जातात.... मध्यम वयाचा लक्ष्मण गडी माडीवरून उतरून येतो– ]

लक्ष्मण : राजाभाऊ....

राजा : हु हु हुहु....

लक्ष्मण : हुहु हुहु काय करताय् हीव भरल्यागत ?

बाळ : खु खु खु....

लक्ष्मण : अरे ! काय पिंपळाबिंपळाखालून तर नाय आलात सांजच्या पारी ? अंगात आलेलं दिसतंय् , म्हणून विचारतो !

वामन्या : बरं का, लक्ष्मण....हु हु हु....

लक्ष्मण : आता काय झालं, ते सांगाल, का नुसतेच फवारे सोडत बसाल ?

वामन्या : सांगू का, रे, याला ?

राजा : ए, नको, ए....

लक्ष्मण : बरं....नका सांगू. ( गाद्या घालायच्या कामाला लागतो. )

वामन्या : लक्ष्मण...आत्ता ना, गल्लीमध्ये....गल्लीमध्ये कुत्री...

लक्ष्मण : ( हसू दाबण्याचा प्रयत्न करीत ) हं....काय करत होती ?

वामन्या : केवढी माणसं जमली होती....

लक्ष्मण : जमायचीच, तुमच्यासारखी रिकामटेकडी पोरं !

वामन्या : नुसती पोरं नाहीत काही....चांगली मोठमोठी माणसंसुद्धा बघत होती !

बाळ : हो....अगदी तुझ्याएवढी !

वामन्या : आणि पोरांनी किती दगडं मारली, तरी ज्याम सुटत नव्हती.

[ तिघेही ' हों....हों.... ' करून हसतात. ]

लक्ष्मण : चांगली पोटभर बघितलीत ना गंमत ? आता मी काय सांगतो, ते ऐका....

बाळ : लक्ष्मण, आब अगदी आपल्या आकडेवाल्या फौजदाराचा आणलायस !

[ पुन्हा सगळे हसतात. ]

लक्ष्मण : आता हसून घ्या वाट्टेल तेवढं !....नंतर रडावं लागणारेय् !

राजा : म्हंजे, रे ?

लक्ष्मण : नानांनी बोलावलंय् वरती, त्यांच्या खोलीत. तेच सांगायला आलोतो. हग्या दम बसणारेय् एकेकाला.

बाळ : कशासाठी पण ? आम्ही काय केलंय् ?

लक्ष्मण : ते तुम्हीच विचारा त्यांना.

राजा : बराय्. नंतर आमच्याबरोबर सिनेमाला येतो, म्हण....

लक्ष्मण : नानांची आर्डर नाय तुम्हांला सांगायची. पण एवढं ध्यानात असू द्या, का नानांच्या खोलीच्या खिडकीतनं गल्लीचं तोंड दिसतं !

राजा : बाप, रे ! म्हंजे आपण गंमत पाहत होतो, तेव्हा.....

लक्ष्मण : नाना तुम्हांला पाहत होते !

[ वरून नानांची करडी हाक : ' लक्ष्मऽण.... ' ]

राजा : मेलो ! चल, बाळ.... पुस्तकं काढ लौकर....

वामन्या : मी गेलो....

बाळ : थांब ना....

वामन्या : नको, रे, बाबा....तुमच्याबरोबर माझंसुद्धा कांडाप निघायचं. मी पळतो. उद्या भेटू या, रे, सकाळी, गंगेवर. ( पळतो. )

[ राजा आणि बाळ, किन्येक तासांपासून अभ्यास करीत असावेत, तसे पुस्तकांत डोकी खुपसून घोकंपट्टी करू लागलेले.
पुन्हा वरून हाक ! ' लक्ष्म....ण .... ' ]

लक्ष्मण : येताहेत दोघे....

[ मुलं पेचात. वर जावं, तरी कठीण; न जावं, तरी कठीण ! मग लक्ष्मणच, त्यांची दया येऊन, स्वतः वर जाऊ लागतो.
इतक्यात नानाच वरून खाली येतात.
नाना : पन्नाशी ओलांडलेले, पण धिप्पाड, धबधबीत गोरे. धोतर नेसलेले, उघड्या अंगाचे. हातात लवलवती छडी.

राजा आणि बाळ घाबरून एकमेकांकडे पाहतात. बोंकपट्टी जोरात सुरू. ]

नाना : मी बोलावलंय् .... हे लक्ष्मणनं सांगितलं नव्हतं ?

राजा : हो.... पण आम्ही अभ्यास करत....

नाना : ( ओरडून ) खोटारडेपणा नको ! बोलावल्याबरोबर वर का नाही आलात ?

राजा : येणार होतो ! ( सपकन् वेत पायावर बसतो. ) आई....

नाना : उलटून बोलतोस ? हरामखोर ! साल्यांनो, गल्लीत घाणेरडेपणा करीत होता, की नाही ? ( दोघांनाही छडीनं मारू लागतात. लक्ष्मण धावत आत जातो. ) बघाल ? पुन्हा राहाल उभे, नको ते बघत ? गटारफुंक्ये शिंदळीचे ! अरे, कोणाच्या पोटी जन्माला आलोत, याचा तरी काही विचार ? बाप नाशकातला नावाजलेला डॉक्टर.... आणि पोरं रस्त्यात कुत्री बघताहेत ! थांबा... जन्माची आठवण राहील, असं बडवून काढतो, म्हणजे पुन्हा असला अधमपणा करायचा नाहीत ! डुकरं कुणीकडची ! बोला.... बघाल ? बघाल पुन्हा असला तमाशा ?

राजा/बाळ : ( मार खात ) नाही....नाही....

नाना : आता नाही म्हणताय्, उद्या जाल पुन्हा शेण खायला !

राजा : मारू नका, नाना....

नाना : मारू नका ? अरे, चामडी लोळवली पाहिजे तुमची !

[ आतून चंद्राक्का धावत येते. तिच्या मागे लक्ष्मण. ]

चंद्राक्का : ( राजा–बाळला पाठीशी घालत ) साहेब.... हात आवरा ! शपथ आहे, साहेब, तुम्हांला ! हात आवरा !

नाना : भोसडीचे कसले गुण उधळत होते, विचार !

चंद्राक्का : पुन्हा नाही असं करायचे ! ( मुलांना जवळ घेते. नानांना ) टाका पाहू ती छडी !

[ नाना छडी खाली टाकतात. ]

चंद्राक्का : लक्ष्मण, छडी वर नेऊन ठेव–साहेबांच्या खोलीत.

[ लक्ष्मण छडी घेऊन जातो. ]

नाना : माझ्या तर सणदिशी टाळक्यातच गेलं! घरचे सगळे संस्कार म्हशीच्यात घातले रांडेच्यांनी! खाणंपिणं राजासारखं आणि गेले उकिरड्यावर डुकरासारखे, खायला....

चंद्राक्का : जाऊ दे ना, उगाच मनस्ताप किती करायचा? लहान आहेत ते! त्यांना काय समजतंय्? आता एकदा सांगितलंत ना, मग पुन्हा नाही असला वेडेपणा करायचे! चला, रे! 'चुकलो' म्हणून टाका....

राजा/बाळ : (रुद्ध कंठानं) चुकलो!

चंद्राक्का : आता हात–पाय धुऊन घ्या बरं! तोवर मी साहेबांना वाढते. (नानांना) तुम्ही जेवून घ्या लौकर! उशीर झाला, की पित्त उसळतं तुमचं. घेऊ ना पानं?

नाना : घे.

[ चंद्राक्का मुलांशी हसून स्वैंपाकघरात जाते. तिच्यामागून नाना आत जातात. ]

राजा : बाप, रे! काय खवळले होते नाना आज! चंद्राक्का होती, म्हणून वाचलो आपण!

बाळ : चंद्राक्का कशी आईसारखी वागते, नाही, रे आपल्याशी?

राजा : एहे, रे! तुला काय माहीत, आई कशी वागते मुलांशी, ते?

बाळ : वा.... पुस्तकात नसतं वाटतं?

राजा : काय की! खरी आई, एखादवेळी, मधे पडलीच नसती, नानांच्या भीतीनं!

बाळ : पण खरंच! का मारलं, रे, नानांनी आपल्याला?

राजा : मलाही नाही माहीत!

बाळ : अभ्यास सोडून गंमत पाहत बसलो, म्हणून?

राजा : तेवढ्यासाठी इतकं मारतील?

बाळ : आणि कुत्री पाहिली, तर घाणेरडेपणा काय झाला?

[ लक्ष्मण माडीवरून खाली येतो. ]

बाळ : लक्ष्मण, तुला ठाऊकेय् का, रे, नानांनी आम्हांला का मारलं?

लक्ष्मण : भले ! म्हंजे तुम्हांला माहीतच नाही ? रामायण होऊन गेलं, न् विचारा....

राजा : बऱ्या बोलानं सांगतोस, की नाही ?

लक्ष्मण : राजाभाऊ, असल्या गोष्टी चांगल्या मुलांनी पाहायच्या नसतात.

राजा : असल्या, म्हंजे ?

लक्ष्मण : म्हंजे, असं बघा.... तुम्ही शाळेत शिकणारी मुलं....

राजा : आधी, असल्या, म्हंजे काय, ते सांग.

लक्ष्मण : म्हंजे बघा.... एरवी कुत्री मारामारी करतात, ते वेगळं....

बाळ : म्हंजे ? ही कुत्री मारामारी नव्हती करत ?

राजा : मग काय करत होती ?

लक्ष्मण : ते समजेल तुम्हांला, राजाभाऊ, जरा मोठं झालात की. (पळ काढतो.)

राजा : पळाला न सांगता. मी पाहिलंय्.... ही मोठी माणसं नेहमी अशीच गंडवतात.

बाळ : म्हणे, मोठं झाल्यावर कळेल. मग मोठं झाल्यावर मारा ! आत्ता कशाला ? ( थांबून ) राजा, आपण चंद्राक्काला विचारू या ?

राजा : नको. तीसुद्धा 'लहान आहात', असंच म्हणेल. असल्या बाबतीत कटच असतो सगळ्या मोठ्या माणसांचा. 'लहान आहात' म्हणायचं, नि सुटायचं.

बाळ : असल्या बाबतीत, म्हंजे ?

राजा : ते तुला नाही समजायचं. तू लहान आहेस अजून.

बाळ : एँहँहँ.... दोनच वर्षांनी तर मोटा आहेस माझ्याहून.

राजा : पण मी हुशार आहे ! तू आहेस कच्चं लिंबू !

बाळ : हे.... वाळका दोडका !

राजा : अळूची भाजी !

बाळ : शिराळं....कारलं !

राजा : मी शिराळं–कारलं काय ? मग बघतोच आता, रडूबाई कशी रडते, ते !

[ राजा त्याच्यामागे धावतो. तो त्याला चुकवीत चुकवीत चिडवत राहतो. उश्या उचलून फेकतो. एक उशी टेबलाला लागते, आणि त्यावरची काचेची फुलदाणी पडते. तशी पळापळ थांबते. चंद्राक्का बाहेर येते. ]

चंद्राक्का : काय चाललंय् ?

राजा : बाळनं फुलदाणी पाडली! आता बाळला मा—र बसणार!

बाळ : आधी यानं मला चिडवायला सुरुवात केली! राजा बाजा बँडबाजा!

[ नाना पंच्याला हात पुसत बाहेर येतात. ]

चंद्राक्का : हे काय, साहेब ? तुम्ही कशाला उठलात जेवणावरून ?

नाना : झालं माझं जेवण!

चंद्राक्का : मागचा भात घ्यायचा राहिला होता!

नाना : नकोय् मला. हे इथं काय चाललं होतं, या दोघांचं ?

बाळ / राजा : (एकदम) यानं मला....

नाना : एका वेळी एकानं बोला. फुलदाणी कोणी पाडली ?

चंद्राक्का : मी पाडली. मी जेवायला चला, म्हणत होते–हे येईनात. ओढून न्यायला लागले, तर स्टुलाला धक्का लागला.

नाना : खरं सांगतेयस ? (ती गप्प.) हे बघ, तुझ्या या अशा नेहमी नेहमी त्यांना पाठीशी घालण्यानंच ते बिघडणार आहेत.

चंद्राक्का : चला, रे! ती फुलदाणी नीट उचलून ठेवा आणि चला जेवायला.

नाना : तुझी त्या पोरांना अशी फूस! मग ते लाडावणार नाहीत, तर काय!

[ तणतणत वर जातात. ]

चंद्राक्का : हां... आता चला लौकर जेवायला! साहेब चिडलेत हं!

[ नाना गेल्यावर मुलं मोकळी सुटतात. दोघेही खुशाल हातपाय पसरून गाद्यांवर लोळू लागतात. ]

चंद्राक्का : आता तुम्ही येताय्, की साहेबांना सांगायला हवं ?

राजा : मघाशी कशी घाबरली! फुलदाणी तू पाडलीस, म्हणून सांगितलंस ना खोटंखोटं ?

बाळ : चंद्राक्का टरकीफाइड!

चंद्राक्का : (हसून) तर! खरं सांगून धिरडं माझ्या पाठीचं होणार होतं नं! आता येणार आहात, की नाही, जेवायला ?

राजा : मला नाही जेवायचं.

बाळ : मला बरं वाटत नाहीये ! देवाशपथ !

चंद्राक्का : बरं, झोपा....आणि थालिपीठ केलंय्, ते मी भांडी घासणाऱ्या सत्य-भामेला....

राजा / बाळ : (एकदम उठून) थालिपीठ केलंय् !

चंद्राक्का : हो....पण तुम्ही झोपा बरं....! नाहीतरी चिक्कार कांदा घातलेलं थालिपीठ इथं आवडतंय् कोणाला ?

[ हसतहसत जाते. ]

बाळ : बघ....चिक्कार कांदा घातलाय्.

राजा : (उशीवर बुक्क्या मारीत) तरी मला मघा वास आलाच होता, थालिपिठाचा. पण नंतर लक्षातच नाही राहिलं.

बाळ : जेवायचं नव्हतं ना, मग बस ! मी जातो थालिपीठ खायला ! एकटा एकटा ईटिंग थालिपीठ !

राजा : ए....चाललास कुठं ? हावरट कुठला ! बस खाली. थालिपीठ हवंय् ना ? मिळणार !

बाळ : कसं पण ?

राजा : तू ओळखत नाहीस चंद्राक्काला. ती काय आपल्याला रिकाम्या पोटी झोपू देणारेय् ? आत्ता येईल बघ थालिपीठ घेऊन.

बाळ : खरंच ?

राजा : मग ? मी राजा आहे ना ? आणि तू प्रधान आहेस ना ? मग, प्रधानजी, मी सांगतो, तसं करा.

बाळ : जी, सरकार.

राजा : डोळे मिटून, झोपल्याचं सोंग करा.

[ दोघेही डोळे मिटून, पडून राहतात. ]

राजा : चंद्राक्का आली, तरी उठू नका.

[ हातात थालिपीठाच्या बश्या घेऊन चंद्राक्का येते. क्षणभर ती फसते. दुसऱ्याच क्षणी, पोरांची लबाडी तिच्या ध्यानात येते. ]

चंद्राक्का : (मोठ्यानं हाक मारीत) लक्ष्म....ण ! जरा या बश्या ने, बाबा....पोरं झोपली.

[ लक्ष्मण येतो. ]

लक्ष्मण : मला हाक मारली ?

चंद्राक्का : ( डोळे मिचकावीत ) या वश्या ने. पोरांसाठी गरमागरम थालिपीठ आणलं होतं कांद्याचं. ते सत्यभामेला नेऊन दे....

लक्ष्मण : आणा वश्या. सत्यभामेच्या मुलांना....

[ वाक्य पुरं होण्याच्या आत, मुलं उठून बसतात. ]

राजा : लक्ष्मण....मागं फीर !

चंद्राक्का : अरे, उठली वाटतं मुलं ! आण, बाबा, त्या वश्या. खाऊ दे त्यांना. आणि तू घे जेवून.

लक्ष्मण : तुम्ही जेवलात ?

चंद्राक्का : माझा उपास आहे आज. तू जेव, आणि नंतर सगळं आवरून घे, हो...

[ लक्ष्मण जातो. ]

राजा : मी आणखी जेवणार नाही हां....सांगून ठेवतो. फक्त एवढं थालिपीठ खाणार.

चंद्राक्का : बरं, तेवढं तरी खा.

बाळ : तू इथंच बस.

चंद्राक्का : बसते. संध्याकाळी, शर्ट फाटला म्हणत होतास ना ? तो शिवून टाकते. हां हां....खाण्यावरून उठू नकोस. मी घेते बघून. ( शर्ट शोधून घेते, व शिवू लागते. ) आवडलं का थालिपीठ ?

बाळ : हो....झक्क झालंय् !

चंद्राक्का : राजा, शाळेचा अभ्यास झाला ?

राजा : थोडासा राहिलाय् . सकाळी करीन.

चंद्राक्का : बघ, हो....तिमाही पंधरवड्यावर आलीय् . नुसतं होमवर्क करून भागायचं नाही.

राजा : हो, पहाटे उठवशील ना लौकर ?

चंद्राक्का : उठवीन. गणितावर जोर दे जरा. मला कळत नाही तुझं ते इंग्रजी गणित, नाहीतर मीसुद्धा तुझा अभ्यास घेतला असता.

राजा : अभ्यास आणिक कशाला घ्यायला हवा ? हे करतेय्स, तेवढं कमी का आहे ?

चंद्राक्का : काय करतेय् एवढं मोठं? आपल्या घरासाठी कुणीही खपतं. (राजाचं खाऊन झालेलं. त्याला) आणखी हवंय् ?

राजा : नको. (तोंड धुवायला दाराबाहेर जातो.)

बाळ : चंद्राक्का, गूळपापडीच्या वड्या कधी करणार?

चंद्राक्का : (हसून) एकसारखी खाण्याची स्वप्नं बरी पडतात तुला! करीन, हो, उद्यापरवा.

[बाळ उठून तोंड धुवायला जातो. राजा परत येतो.]

चंद्राक्का : झोप आता. सकाळी लौकर उठायचंय् ना?

[मुलांच्या अंथरुणाशी बारीक कंदील लावून ठेवते, दिवे मालवते, आणि घरात जाते. मुलं अंथरुणावर पडल्या पडल्या गप्पा मारू लागतात.]

बाळ : बरं का, राजा, आमच्या वर्गातला तो फेंगड्या काळे आहे ना, त्याची आई, म्हणे, इतकी वाईट्ट आहे! एकदम खाष्ट्ट! कध्धी त्याच्या आवडीचं खायला करत नाही! एकसारखी कामं सांगते! असं ऐकलं, की वाटतं, आपल्याला आई नाही न् चंद्राक्का आहे, तेच बरं!

राजा : तुला आठवते आपली आई?

बाळ : अगदी थोडीश्शी आठवते. पण कशी दिसायची, ते नाही आठवत. तुला आठवते?

राजा : मला आई खूप वेळा दिसते.

बाळ : दिसते, म्हंजे?

राजा : म्हंजे माझ्या डोक्यात कायतरी विचार यायला लागले नं, की मला भास होतो, आपण आईशी बोलतोय्, असा.

बाळ : हॅ.... बंडल! मला नाही तो भास होत?

राजा : तू कसला डोंबलाचा विचार करतोस? येऊन-जाऊन खाण्याचा!

बाळ : उगाच भाव नको खाऊस. एवढं असेल, तर आई दिसते कशी, ते सांग पाहू!

राजा : दिसते कशी?.... कोण जाणे! पण तिला मनातलं सगळं सगळं सांगितलं, की बरं वाटतं, बघ.

[ चंद्राक्का एक उंच चांदीचा पेला घेऊन माडीवर चाललेली. ]

चंद्राक्का : हे काय, अजून तुम्ही जागेच ?

राजा : झोपलो.... ( दोघेही आडवे होतात. )

बाळ : नानांना दूध घेऊन चाललीस ना ? त्यांना तेवढं चांदीच्या पेल्यातनं दूध ! उद्यापास्नं मला देखील हवा चांदीचा पेला !

चंद्राक्का : ( हसून ) बरं बरं, देऊ या. आता झोपा. ( वर जाते. )

राजा : तुला एक गंमत सांगू, बाळ ? बघ हं, कोणाला सांगणार नसलास, तर सांगतो.

बाळ : हॅ.... नको सांगूस. आपल्याला काय ?

राजा : ए, ऐक ना.... आपल्या मथूआत्याच्या घरासमोर ती बंगली आहे नं, हिरव्या रंगाची, तिथं एक खूप गोड मुलगी आल्येय् राह्यला. गोरीगोरी ! हसते तर इतकी सुंदर !

बाळ : ही गंमत ? हॅट् ! फालतू कायतरी ! पोरींचं काय सांगतोस ? सगळ्या पोरी बिनडोक असतात ! नाव काय या बिनडोकचं ?

राजा : गुलबकावली.

बाळ : इतकं लांब नाव ? गोष्टीतलं वाटतं.

राजा : गोष्टीतलंच आहे ! मी ठेवलंय्. नाहीतर खरं नाव मला कुठं माहीताय् ?

बाळ : विचारायचंस.

राजा : हट् !.... पोरींशी कोण जातं बोलायला ? आमची तर ओळखसुद्धा नाही....

बाळ : अस्सं होय ? मला वाटलं, ती तुझी बायको....

राजा : लाफा मारीन हं, असं कायतरी बोललास, तर !

बाळ : एवढं चिडायला काय झालं त्यात ?

राजा : नाही होणार वाटतं चिडायला ? ( हलक्या आवाजात ) अरे, बायको, म्हंजे खूप चावट असतं.

बाळ : तुला काय माहीत ?

राजा : वामन्यानं सांगितलं.

बाळ : वामन्याला काय माहीत ?

राजा : त्याच्या थोरल्या भावाचं नाही का हल्ली लग्न झालं ? वामन्या सांगतो, की त्याचा दादा आणि वैनी खूप काय काय करतात, येडचाप-सारखं !

बाळ : ( उगाच, गंभीरपणे ) असं ! खरं वाटत नाही !

राजा : वामन्या माडीच्या फळ्यांच्या फटीतून बघत बसतो, म्हणे ! पण तो भयंकरच काहीतरी सांगतो.... माझा नाही विश्वास बसत.

बाळ : काय सांगतो ?

राजा : शीः ! मी नाही असलं घाणेरडं काहीतरी सांगणार तुला. झोप तू. मी पण झोपतो.

बाळ : मला बरं नाही वाटत, राजा. थंडीपण वाजतेय्. ताप येणार बहुतेक.

राजा : झोप, म्हंजे बरं वाटेल.

[ दोघेही अंथरुणावर अंग टाकतात. ]

बाळ : मला नाही येत झोप.

राजा : मी राजा आहे ना ? मग, प्रधानजी– ताबडतोब– या क्षणी– झोपून जा ! ( थांबून ) झोपलात ? ( उत्तर नाही. ) प्रधानजी, मी झोपलात का, ते विचारलं. झोपला असलात, तर 'झोपलो, सरकार' असं का नाही म्हणत ?

बाळ : मी झोपलोय्, तर बोलू कसा, सरकार ?

राजा : बरं, बरं.... जास्त अक्कल नको शिकवू. ( थांबून ) नानांनी असं मारलंय्.... अजून दुखतेय् पाठ !

[ प्रकाश मंदावत जातो. मग एक वेगळाच प्रकाश सर्वत्र पसरतो. एक स्त्री हातात वाटी घेऊन येते. ]

स्त्री : राजा.... उठून बस बरं. मी हळद लावते पाठीला.

[ तो उठून बसतो. ती त्याचा सदरा वर करून पाठीला हळद लावू लागते. ]

राजा : आई, तू बायको ना, ग, नानांची ?

आई : हो....

राजा : म्हंजे तू आणि नाना....

आई : काय ?

राजा : काही नाही. तो वामन्या, ग.... काय वाट्टेल ते सांगतो. ( थांबून ) आई, तू नेहमी नेहमी का नाही, ग, येत ?

आई : नेहमी कशाला हवीय् मी तुला ? चंद्राक्का आहे ना ?

राजा : चंद्राक्का काय, माझी आई नाही.

आई : नाही कसं म्हणतोस ? करते सगळं आईसारखंच ना ?

राजा : पण ती... ती नानांची बायको नाही. आणि ती.... लहान आहे खूपच. आपल्या ताईपेक्षा जेमतेम दोन वर्षांनी मोठी. ती कशी असेल माझी आई ?

आई : राहिलं.

राजा : आई, तू माझ्या स्वप्नात येत जा ना नेहमीनेहमी.

आई : कशाला ?

राजा : म्हंजे ती दुसरी.... घाणेरडी स्वप्नं नाही पडायची मला. ( थांबून ) मला फार भीती वाटते, आई, त्या स्वप्नांची. त्या स्वप्नांत मी कसातरी वागतो. वेड्यासारखा. त्यातनं तो वामन्या कायतरी सांगतो, ते सगळं दिसतं स्वप्नात. आई, मला पाप लागेल का, ग, तसली स्वप्नं पडली, तर ?

आई : वेडा कुठला ! पाप कसं लागेल ? तू प्रत्यक्षात थोडंच काही वाईट करतोयस् ?

राजा : तरी नकोच.... स्वप्नात देखील नको. मला भीतीच वाटते. रोज रात्री झोपताना मी रामाला नमस्कार करतो– आणि म्हणतो, की आज तसलं स्वप्नं नको पडू दे. तरी दर दोन–चार दिवसांनी.... पडतंच स्वप्न ! मलाच का, ग, आई, अशी स्वप्नं पडतात ? मी मनानं खूप वाईट्ट आहे का, ग ? चावट, फाजील, घाणेरडा आहे का, ग ? ( दूरवरून कुत्र्यांचं भुंकणं ऐकू येतं. लोकांचं हसणं. ) तुला ठाऊकेय्, आई, आज ना, आपल्या गल्लीच्या तोंडाशी कुत्र्यांचा खूप गोंधळ चालला होता ! पण लोक कुत्र्यांना धोंडे का, ग, मारतात, आई ? लोकांचं काय जातं ? ( भुंकणं आणि हसणं वाढतं. त्यातच, लांबच्या देवळातून येणारा भजनाचा सूर मिसळतो. आई नाहीशी होते. ) आई....आई ! कुठं गेलीस तू ? छे ! आजसुद्धा आईचा चेहरा नीट बघायचा राहिलाच !

[ प्रकाशयोजना बदलते. पुन्हा कंदिलाचा मिणमिणता प्रकाश दिसू लागतो. कुत्र्यांचं भुंकणं, आणि लोकांचं हसणं थांबलेलं. मात्र भजनाचा आवाज दृश्य संपेपर्यंत चालूच राहतो....

राजा अंथरुणात उठून बसतो. शेजारी बाळ झोपेत कण्हतो. ]

बाळ : ( कुशी पालटत ) आई, ग....!

राजा : ( कंदील मोठा करीत ) कण्हायला काय झालं ? दुखतेय् का पाठ ?

बाळ : पाणी ...

राजा : देतो, थांब. ( त्याला तांब्यात पाणी ओतून देतो. ) फार त्रास होतोय् का, रे ? ( त्याच्या कपाळाला हात लावून पाहतो. ) बाप, रे ! अंग गरम लागतंय् तुझं ! थांब....मी नानांना उठवतो.

बाळ : नको. त्यांना कशाला उगाच ? झोपमोड झाली, तर ते रागावतील!

राजा : अरे, ते डॉक्टर आहेत. तुला ताप आला असताना त्यांना सांगितलं नाही, तरच उलटं ते रागावतील ! झोप तू. मी आलोच.

[ कंदील घेऊन वर जातो.
नानांची खोली पूर्ण काळोखात. दार लोटलेलं. राजा कंदील घेऊन दारात येतो.
'नाना....' अशी हाक मारणार, एवढ्यात त्याला जे दिसतं, त्यानं तो अवाक् होतो.
चटकन् मागं सरतो, आणि तरीही, भारल्यासारखा, खोलीच्या, रंगमंचावर न दिसणाऱ्या भागाकडे पाहत राहतो. त्याच्या हातल्या कंदिलाच्या प्रकाशात, त्याच्या चेहऱ्यावर भय, जिज्ञासा, उत्सुकता आणि उबग यांचं विचित्र मिश्रण दिसतं.
तो वळतो....आणि जिन्यावरनं घाईघाईनं, पण पाय न वाजवता खाली येतो. ]

बाळ : काय झालं ? सांगितलंस नानांना ?

राजा : ( त्याची नजर टाळीत ) नाही.

बाळ : का ? ( राजा गप्पच. ) आणि असा काय दिसतोय्स तू ? भूतबीत दिसलं, की काय, माडीवर ?

राजा : नाही. ( त्याला घाम फुटलेला. स्वतःलाच सांगितल्याप्रमाणे )....मला काही दिसलं नाही. मी काही पाहिलं नाही. मला काही दिसलं नाही.

[ बाळ त्याच्याकडे आश्चर्यानं पाहतो. मग कुशी वळून झोपी जातो. राजा विचार करीत बसून राहतो. ]

का ळो ख

## प्रवेश दुसरा

[ तीन दिवसांनी.
संध्याकाळची वेळ.
चंद्राक्का घर आवरते आहे. एवढ्यात, दारात बाळकू येतो.
स्वारी एका पायानं अधू. मध्यमवयीन. तोंडात विडी. डोक्यावर कलती टोपी. अंगात मळका कोट. ]

बाळकू : ( बाहेरूनच ) डॉक्टरसाहेब इथंच राहतात का ?

[ क्षणभर दोघंही एकमेकांकडे पाहत राहतात. 'कुठं बरं पाहिलंय् ?' अशा विचारात. मग–]

चंद्राक्का : ( एकदम ओळख पटून ) अगोबाई ! बाळकू....तू ?

बाळकू : म्हंजे तू....चंद्री ! बरोब्बर ! राजापूरच्या शंकरभटाची सून !

चंद्राक्का : हं ! शंकरभटाची सून !

बाळकू : पण तू कशी या नाशकात ?

चंद्राक्का : मलेरियाच्या साथीत त्यांचा मुलगा गेला, न् त्याचं खापर फोडलं माझ्यावर ! पांढऱ्या पायाची, म्हणून मला हात धरून घराबाहेर काढलंनी.

बाळकू : आठवतंय्. खूप दुमदुमलं होतं गाव तेव्हा !

चंद्राक्का : लोकांचं काय, चार दिवस बोलले न् गप्प बसले ! एकजण पुढं आला नाही शंकरभटाला जाब विचारायला, की मला दोन वेळचं अन्न घालायला ! इथं आले, ती वनवाशी होऊनच ! डॉक्टरांनी आसरा दिला नसता, तर काय धिंडवडे झाले असते, कुणास ठाऊक !

बाळकू : खरं हो, बायो !

चंद्राक्का : माझं राहू दे. तू इथं कसा आलास ?

बाळकू : अगो, आता इथलाच मी. राजापूर सोडलं. कायमचं. आता इथं स्टयाम्पाचा धंदा घालायचा विचार आहे !

चंद्राक्का : कसला धंदा ?

बाळकू : रबर स्ट्याम्प, गो ! ठसे ! धंदा तसा लहानसाच !... पण आपल्या आटोक्यातला आहे ! नायतर आपण काय छापखाना का घालणार ? हा धंदासुद्धा तुझ्या या डॉक्टराच्याच जिवावर काढणारेय् !

चंद्राक्का : म्हंजे ?

बाळकू : म्हंजे सावकारी करतात नं ते ?

चंद्राक्का : सावकारी कसली ?....तिजोरीत ठेवून द्यायचे पैसे, ते कुणाच्या कारणी लागले, तं बरं, नाही का ?

बाळकू : त्यासाठीच आलो होतो ... पैसे मिळतील का, विचारायला. बाचकतच होतो आधी. पण आता काय, तूच इथं आहेस, म्हंजे हक्कानं विचारीन ! डॉक्टरांनी नाही म्हटलं, तर टाकशीलच शब्द !

चंद्राक्का : त्याची गरज नाही पडायची. देतील ते. जा वर, साहेब आहेत. बोल जाऊन त्यांच्याशी.

बाळकू : सरळ जाऊ वर ? रागवायचे नाहीत नं ?

चंद्राक्का : जा, जा....काही नाही म्हणायचे !

[ तो जाऊ लागतो. ]

बाळकू : ( जाताना, वळून ) अग, हो....सांगायचं राहिलंच. आपल्या राजापूरचा तो हा आहे इथं.

चंद्राक्का : तो हा, म्हंजे कोण ? त्याला काही नावगाव ?

बाळकू : हा, ग, आपलाऽ–खोताचा पोरगा ! फौजदार आहे इथं. तुला नाही माहीत ?

चंद्राक्का : माझा कशाला संबंध येतोय् फौजदाराशी ?

बाळकू : पाहिल्याबरोबर ओळखशील. मीच घेऊन जाईन एकदा. घसट असलेली बरी हुद्द्यावरच्या माणसाशी. अडचणीला कामाला येते. त्यातनं हा माणूस चांगला आहे ! परवा भेटला, तेव्हा प्रेमानं चौकशी केली माझी. एवढा मोठा अधिकारी; पण तेरम नाही नाकावर ! येशील ना माझ्याबरोबर त्याच्याकडे ?

चंद्राक्का : येईन, हो. जा आता वरती.

[ बाळकू जातो. चंद्राक्का परत आवरासावर करू लागते.
एवढ्यात बाळ आणि राजा शाळेतून परत येतात. बाळ घाईगड-

घाईनं येतो. राजा मात्र शांतपणे आत येतो.

गेल्या तीन दिवसांत राजा जसा काही तीन वर्षांनी मोठा झालाय्. त्यामुळे त्याच्यात व बाळमध्ये अधिकच अंतर पडल्याचा भास होतो.
बाळ आल्याबरोबर दप्तर बैठकीवर फेकतो; आणि ओरडतो....]

बाळ : चंद्राक्का–खायला....

[ चंद्राक्का दारात येते. ]

चंद्राक्का : आल्या का स्वाऱ्या शाळेतून ?
बाळ : आधी खायला दे. भूक लागलेय् भयंकर.
चंद्राक्का : देते. पण हातपाय तरी धुऊन घ्या. का तसेच बसणार आहात खायला ?

[ राजा शांतपणे आपलं दप्तर जागेवर ठेवतो. बाळचंही दप्तर उचलून खिळ्याला लावू लागतो. ]

बाळ : (उगाच कुरापत काढण्यासाठी) तू माझ्या दप्तराला हात का लावलास ?

[ राजा काही न बोलता दप्तर परत बैठकीवर ठेवतो. ]

बाळ : ए–असं, रे, काय ? गंमतसुद्धा समजत नाही ? मघापासून नुसता घुम्या झालायस्, म्हणून मी सुई टोचली.
राजा : कळलं.
बाळ : रस्ताभर पाहतोय्.... तू एक शब्द बोलायला तयार नाहीस. झालंय् काय तुला ?
राजा : काहीही झालेलं नाही.

[ बाहेर जाऊन हातपाय धुऊ लागतो. एवढ्यात, चंद्राक्का, शिऱ्याच्या वाट्या घेऊन येते. ]

बाळ : गोडाचा शिरा !....मला नको !

चंद्राक्का : अरे, असं काय करतोस ? किती चांगला झालाय्, खाऊनतरी बघ. बेदाणा घातलाय् !

बाळ : मला आवडत नाही म्हटलं ना शिरा ? मला तिखटमिठाचा सांजा आवडतो. (हातपाय धुवायला जातो.)

चंद्राक्का : (दारात उभी राहून )उद्या करीन सांजा. अरे, राजाला गोड आवडतं, म्हणून आज शिरा केला. एक दिवस तुझ्या आवडीचं, एक दिवस त्याच्या....

[ राजाला बशी देते. ती तो मुकाट्यानं घेतो, आणि खायला बसतो.]

चंद्राक्का : काय, राजा ?

राजा : हूं.

[ बाळ हातपाय धुऊन परत येतो. ]

चंद्राक्का : ( त्याला पंचा देत ) शिवाय दोन दिवस तुला ताप होता. एकदम फार तिखटबिखट खाऊ नये...

बाळ : ( रागातच ) आणा....( बशी घेऊन भराभर खाऊ लागतो. )

चंद्राक्का : अरे, हळू, हळू....ठसका लागेल ! सावकाश खा, मी दूध आणते.

बाळ : मला नको दूध !

चंद्राक्का : साहेब घरात आहेत, बरं.

[ राजा तिच्याकडे साभिप्राय पाहतो, मग मुकाट्यानं खाऊ लागतो. ]

बाळ : बरं बरं...धमकी नको देऊस. मी घाबरत नाही नानांना.

चंद्राक्का : असं ? ( जिन्याच्या दिशेनं जाऊ लागते. )

बाळ : ( हळूच ) आण दूध.

[ चंद्राक्का हसून, दूध आणायला जाते. ]

बाळ : ( राजाला ) क्रिकेट खेळायला येणार नं ?

राजा : नको....तू जा एकटाच.

बाळ : असं काय, रे, चक्रमसारखं करतोयस– त्या दिवसापासनं ?

राजा : कुठल्या ?

बाळ : मला ताप आला, त्या. तेव्हापासनं कुणाशी बोलत नाहीस, हसत नाहीस, मारामारी करत नाहीस. नुसता आपला हुप्प बसून असतोस ....झालंय् काय तुला ?

राजा : कुठं काय ? काही नाही....

बाळ : मग खेळायला का नाही येत ?

[ जिन्यावरून बाळकूबरोबर उतरून येणारे नाना हे ऐकतात. ]

नाना : कोण जात नाहीये खेळायला ?

बाळ : हा...राजा.

नाना : का, रे, बाबा ? तब्येत ठीक नाही ?

राजा : ठीक आहे.

नाना : मग खेळायला का नाही जात ?

राजा : आज खूप गणितं दिलीयत आलजिब्र्याची.

[ दुधाचा कप घेऊन चंद्राक्का येते. ]

नाना : ( बाळकूला ) बरं, तुम्ही या आता. उद्या सकाळी या पैसे न्यायला.

बाळकू : मेहरबानी ! (चंद्राक्काला) काम झालं, बरं का, चंद्रे !

नाना : तुझ्या गावचा आहे, म्हणतोय्. खरं का ?

बाळकू : खरं का, म्हंजे, अहो शंकरभटाचं घर आमच्या घरापासनं....

नाना : तिला विचारतोय्.

चंद्राक्का : हो.... माझ्या माहितीचाच आहे !

नाना : उद्या या दवाखान्यात....

[ बाळकू जातो. ]

नाना : बाळ.... तुला बरं वाटतंय् ना ? दोन दिवसांच्या तापानंतर आज पहिल्यांदाच शाळेला गेलास, म्हणून विचारतो. नंतर दोन चमचे ग्लायकोडिन घे माझ्या फडताळातनं. समजलास ? आळस नको करू. काय ?

बाळ : घेईन.

नाना : तेव्हाच्या तेव्हा औषध घेतलं असतंस, तर दोन दिवस ताप राहिलाच नसता. रात्रीच कसकस वाटत होती, तर मला सांगायला सकाळपर्यंत का थांबलास ?

बाळ : राजा गेला होता तुम्हांला उठवायला.

[ चंद्राक्का आणि नाना एकमेकांकडे निसटतंसं पाहतात. ]

नाना : मग ?

बाळ : म्हणाला....तुम्ही झोपलाय्. म्हणून तसाच परत आला.

नाना : अस्सं ! मी झोपलो होतो ?

राजा : अंधार होता. मी नीटसं पाहिलं नाही. मला काही दिसलं नाही. मी काही पाहिलं नाही.

[ नाना क्षणभर त्याच्याकडे साशंक होऊन बघत राहतात. मग.... ]

नाना : माझ्यासाठी थांबू नका. उशीर झाला, तर जेवून घ्या.... (जातात.)

[ चंद्राक्का भांडी गोळा करून घरात जाते. राजा डेस्कशी जाऊन उगाच पुस्तकांची चाळवाचाळव करू लागतो. ]

बाळ : मी सांगतो. तुझं काय तरी बिनसलंय्. समथिंग गडबडिंग ! मग उगाच अभ्यासाचं नाटक करण्यापेक्षा....

राजा : ( चिडून ) आता जातोस, की नाही, तू ?

[ वामन्या येतो. ]

वामन्या : ( मोठमोठ्यानं गात ) मार कट्यार मर जाना, ओ रसिया, किसीसे मिलाना ना, हो....दणादणा....

बाळ : वामन्या, लेका, मवाल्यांसारखी सिनेमातली गाणी काय म्हणतोय्स ? हे घर सभ्य माणसांचं आहे !

राजा : हो.... सभ्य माणसांचं आहे !

वामन्या : आयला, ते विसरलोच. सॉरी हां. ( हळूच ) नाना आहेत वरती ?

बाळ : सॉरी काय ? नाना नाहीएत, म्हणून सुटलास. नाहीतर तुला घर

कायमचं बंद करून, सॉरीअर सॉरीएष्ट केलंनी असतं !

वामन्या : येतोयस् ना खेळायला ? लौकर चल. तासाभरात अंधार पडेल.

बाळ : सामान कुठाय् ? का क्रिकेट म्हणालास, न् शेवटी गल्लीत गोट्या ?

वामन्या : धन्यच आहेस ! सामान इथं आणू ? बांबू, गोवऱ्या, मडकं–सगळं ग्राऊंडवर टाकून आलो. आणि राजा ? राजा नाही वाटतं येत ?

बाळ : ते झालं विचारून, आठशे सत्याहत्तर वेळा. तू आणखी कशाला भाव देतोस शिष्टांना माणसांना ? चल. ( दोघे जातात. )

चंद्राक्का : ( तांदळाचं फुलपात्र हातात घेऊन बाहेर येत ) मी जरा देवळात जाऊन येते, रे, राजा. ( जाते. )

[ एवढ्यात वामन्या पळतपळत परत येतो. ]

वामन्या : राजा....राजा....ही बघ गंमत ! लौकर बघ....बाळ येईल....

[ त्याच्या हातात एक मोठा चौरस कागद देतो. ]

राजा : काय आहे हे ?

[ वामन्याच्या पाठोपाठ बाळ येतो. ]

बाळ : हे काय, वामन्या, परत कशाला आलास ? प्रायव्हेट सीक्रेट काय ? बघू, बघू....

वामन्या : तुझ्या उपयोगाचं नाहीये.

बाळ : ( त्याच्या हातातून काढून घेऊन, बघत ) फुस् ! फुलपाखराचं चित्र ! असली एक हजार सातशे पंचाहत्तर चित्रं आहेत माझ्याकडे.

वामन्या : ( राजाला ) राहू दे आत्ता तुझ्याकडे. नीट बघ बारकाईनं. नंतर येईन मी न्यायला.

[ वामन्या आणि बाळ जातात.
राजा ते चित्र बाजूला टाकतो, आणि अभ्यास करू लागतो. क्षणभर काहीतरी वाचतो, एवढ्यात त्याच्या डोक्यात एक विचार येतो. तो ते चित्र बारकाईनं पाहू लागतो, चारी बाजूंनी पाहू लागतो. एकदम त्याला त्यात काहीतरी सापडतं. तो चमकतो. पुन्हा लक्षपूर्वक पाहू

लागतो. मग आपण असं पाहत आहोत, या कल्पनेनंच ओशाळतो. चित्र बाजूला ठेवतो. पुन्हा अनावर जिज्ञासेनं ते पाहू लागतो. एवढ्यात दारात कुणाची तरी चाहूल लागते. म्हणून चपापून, चित्र घाईघाईनं डेस्कमध्ये टाकतो. दारात मथूआत्या उभी. ]

मथूआत्या : राजा....अरे, मी तुझी मथूआत्या. का ओळख विसरलास सात वर्षांत ?

राजा : नाही. ओळख कसा विसरेन ? या ना. आत या.

मथूआत्या : सगळं सामसूम दिसतंय्. गेलीत कुठं मंडळी ?

राजा : नाना दवाखान्यात. बाळ खेळायला गेलाय्.

मथूआत्या : आणि ती.... ? ती नसते वाटतं हल्ली इथं ?

राजा : ती कोण ? चंद्राक्का ?

मथूआत्या : तीच, तीच, मेलीचं नावसुद्धा माझ्या लक्षात नव्हतं ! कसं लक्षात राहणार सात वर्षांत ? त्यावेळी नानानं माझ्या शिरीकडे जेवणाचे पैसे मागितले, म्हणून या घरातनं गेले, ती आत्ता येतेय्, हो, शिरीनं नवं घर घेतलं, ते सांगायला !

राजा : हो... कळलं आम्हांला. तुमच्या घरासमोर ती बंगली आहे नं, हिरव्या रंगाची, तिथं....( वेळीच सावरून गप्प बसतो. )

मथूआत्या : तिथं तो आपल्या वकील राहतो. तुमच्या ओळखीचा आहे वाटतं ?

राजा : नाही. आमच्या नाही ओळखीचे.

मथूआत्या : केवढा झालास, रे, सात वर्षांत ! मी ओळखलंच नाही पटकन् ! अंदाजपंचे हाक मारली ! बाळदेखील चांगला मोठा झाला असेल, नाही ?

राजा : हो....इंग्लिश तिसरीत आहे !

मथूआत्या : काय, रे, तुम्हां एवढाल्या मोठ्या पोरांकडे बघायला बाईमाणूस कशाला लागतं घरात ? पूर्वीची गोष्ट एक वेगळी होती !

राजा : असं कसं ? आता चंद्राक्काची सवय झालीय् घराला.

मथूआत्या : कुणाला सवय झालीय् ? घराला, की नानाला ?

राजा : मथूआत्या !

मथूआत्या : दरडावतायस कुणाला ? घाबरायची नाही मी ! बोलूनच दाखवायला आलेते नानाकडे. तो असेल लाख संतापी ! पण मी नाही, हो, भीक घालत त्याच्या संतापाला ! अरे, मी याची सख्खी मावस-

बहीण–वेळाकाळानं, परिस्थितीनं याच्या दारावर आले, तं माझा एकटा एक मुलगा याला जड झाला! (डोळ्यांना पदर लावते.) तो नोकरीला लागताक्षणी लगेच जेवणाचे पैसे टाकायला सांगितलंन्! आणि ही कोण, कुठली, बाहेरची माणसं...ही बरी ठेवून घेतलीत जल्मभर?

राजा : बाहेरची कशी, मथूआत्या? चंद्राक्कानं आजवर आमचं सगळं आईसारखं केलंय्.

मथूआत्या : वेडंवाकडं बोलू नकोस. आईचं कशाला नाव घेतोस? त्या साध्वीच्या पायाचं तीर्थ घ्यायची हिची लायकी नाही. ती बापडी अर्धा संसार सोडून गेली—न् ही आली आयत्या घरावर कुल्ले मुरडायला! या रंभेनंच फुसकुल्या मारल्या! त्याशिवाय का याची हिंमत झाली, आम्हांला घालवायची? पण कुणाला असं जेवत्या पानावरनं उठवायचं, म्हंजे महापाप असतं, हो! पुढं अन्नान्न करीत फिरावं लागेल, की नाही, बघ, हिला! माझे शब्द लिहून घे.

राजा : मथूआत्या....?

मथूआत्या : मघा माझ्यासमोर बोललास, ते बोललास! बाहेर चार लोकांत, आईची पदवी देऊ नकोस, हो, तिला! हसतील लोकं!

राजा : का?

मथूआत्या : का, काय? अरे, ठेवलेली बाई कधी आई होते का?

राजा : ठेवलेली, म्हंजे?

मथूआत्या : तुला लेकराला सांगून काय कळणारेय्? मोठा झालास, की कळेल सगळं. लोकं बोलतातच आहेत. येईल हळूहळू कानांवर!

राजा : (चिडून) मग आत्ता तरी मला कशाला सांगताय्? नानांनाच सांगा की!

मथूआत्या : अरे, पाच–दहा वर्षांत तूच या घरचा कर्ता पुरुष व्हायचास ना? तुला सगळं माहिती हवं! मला सांग, झोपते कुठं ती बया?

राजा : झोपते... (क्षणभर विचारात, मग) स्वैंपाकघरात आणि कुठं? (गुदमरलेला) मी. लक्ष्मणला सांगू का तुमच्यासाठी चहा...

[ चंद्राक्का बाहेरून येते. ]

चंद्राक्का : मथूआत्या, तुम्ही कधी आलात?

राजा : (हायसं वाटून) खूप वेळ झाला. तू गेलीस, आणि लगेच या आल्या.

चंद्राक्का : बसा, मथूआत्या. चहा ठेवते.

मथूआत्या : नको, जाते मी. काय बोलायचं, ते बोललेय् राजाकडे. आता कशाला थांबायचं ?

चंद्राक्का : अहो, पण....

मथूआत्या : त्यातनं बाटग्या माणसांच्या हातचं पाणीसुद्धा प्यायचं नाही मला. ( जाते. )

चंद्राक्का : ( अपमान गिळून ) आल्या काय, न् गेल्या काय ? काय सांगायला आल्या होत्या ?

राजा : त्या नं ?... त्या....केवढं अंधारलंय् !

[ जाऊन दिवा लावतो....आणि डेस्कपाशी बसतो. ]

चंद्राक्का : राजा, तुला विचारतेय् मी....मथूआत्या कशाला आलत्या ?

राजा : ( काय सांगावं, या विचारात ) त्या....नं.... गावात नवं घर घेतलं शिरीनं, ते सांगायला....

[ वामन्या आणि बाळ येतात. ]

राजा : हे काय, एवढ्यात आटपली मॅच ?

बाळ : पाऊस आला, म्हणून...नाहीतर आम्ही त्या लोकांना ज्याम पिदवले असते.

चंद्राक्का : अरे, केवढा भिजलायस ? दोन दिवस अंगात ताप होता....आणि आज भिजून आलास ? चल, तुझं डोकं पुसते—

[ बाळला घेऊन आत जाते. ]

वामन्या : मी जातो. माझं फुलपाखरू...

राजा : ( डेस्कमधून काढून देत ) घे.

वामन्या : लगेच दिलंस....म्हंजे त्यातली गंमत समजलेली दिसत नाहीये तुला. अरे, त्या फुलपाखराच्या काळ्या पंखांत, मधेमधे ती पांढरी जागा सोडल्येय् ना....

राजा : ( तुसड्यासारखं ) समजलं, रे, मला.

वामन्या : मग ?

राजा : घाणेरडी चित्रं आहेत ती. मला नाही हे खरं वाटत. हे सगळं असं असतं ? इतकं घाण ?

वामन्या : असंच असतं. पण घाण नसतं. त्यात खूप मज्जा असते.

राजा : तुला काय माहीत ?

वामन्या : माहीतेय्. मी तुझ्यासारखं ' शिराळं–कारलं ' नाही. डोकेबाज नंबर वन् आहे ! एक दिवस मीसुद्धा असं करून पाहणारेय्–आमच्या दादासारखं.

राजा : काहीतरी बडबडू नकोस. तुला कसं करता येईल दादासारखं ? तुझं काय लग्न झालंय् ?

वामन्या : ( मोठमोठ्यानं हसतो. ) लग्न कशाला व्हायला हवं ? परवा आपण गल्लीत कुत्री पाहिली....त्यांचं काय लग्न झालं होतं ?

राजा : म्हणजे....( त्याच्या डोक्यात हळूहळू प्रकाश पडू लागलेला. )

वामन्या : ( चित्र दाखवून ) हे....सगळं स....गळं करतात मोठी माणसं. अगदी असंच करतात. तुला वाटू दे खोटं. पण मी विद्येशप्पथ सांगतो. अगदी तुझे नाना नि चंद्राक्कादेखील हेच करतात. लग्न न होता.

राजा : ( संतापानं ओरडून ) वामन्या....

[ त्याच्या अंगावर धावून जातो. त्याला खाली पाडतो. त्याच्या छातीवर बसतो. आणि त्याचं डोकं दोन्ही हातांत धरून जमिनीवर आपटू लागतो. गडबड ऐकून चंद्राक्का, आणि बाळ धावत येतात. लक्ष्मण त्यांना सोडवतो. ]

चंद्राक्का : काय झालं ? झालं काय , एवढं हातघाईवर यायला ?

वामन्या : मी म्हणालो....

राजा : वामन्या...

वामन्या : मी याला म्हणालो....' शिराळं–कारलं ! ' ( चिडवीत ) शिराळं-कारलं !

[ राजा सुटकेचा निःश्वास टाकतो. ]

चंद्राक्का : एवढ्यावरून इतकी मारामारी ? काय झालंय् हल्ली याला, तेच कळत नाही !

[ चंद्राक्का आत जाऊ लागते. ]

बाळ : ( चंद्राक्काला ) नानांच्या फडताळाची चावी....?

चंद्राक्का : तुला कशाला हवीयं ?

बाळ : ग्लायकोडिन घ्यायला. नानांनी सांगितलंय् , फडताळातून घे, म्हणून.

[ चंद्राक्का त्याला कडोसरीची चावी देते. तो वर जातो. लक्ष्मण गेलेला. चंद्राक्का जाते. ]

वामन्या : चलो, राजासाब. हम कटेंगे.

राजा : तुला राग आला, वामन्या ?

वामन्या : हॅट् ! राग काहे का ? दोस्तीमें तो ऐसा होताच है !

राजा : काही सुचेचना, वामन्या. डोकं एकदम सणकलं.

वामन्या : सणकायचंच. सांगतो, ते तुला खरं वाटत नाही ना ? म्हणून....

राजा : नाही, वामन्या. खरं वाटतं, म्हणूनच.

वामन्या : ( आश्चर्यचकित. ) काय म्हणालास ?

राजा : खरं कसं वाटणार नाही, वामन्या ? स्वतःच्या डोळ्यांनीच पाहिल्या-नंतर....

वामन्या : तू पाहिलंस ? कधी ?

राजा : परवा रात्री. तेव्हापासनं माझं कशात लक्षच लागत नाहीये. कोणा-जवळ बोलताही येत नाही. घुसमटतोय् , रे, मी.

वामन्या : कुणाला पाहिलंस पण तू ?

राजा : नानांना न् चंद्राक्काला. मी अर्धवट झोपेत. त्यातनं काळोख.... पाहिलं, ते इतकं भयंकर वेडंविद्रं, अभद्र वाटत होतं....तेव्हापासून रोज रात्री मला ते डोळ्यांसमोर दिसतं !

वामन्या : वेडा आहेस तू ! फार हळवा आहेस ! अरे, यात विशेष काय आहे ! जरा मोठा झालास, की हे सगळं तुझ्या सरावाचं होईल !

राजा : सरावाचं होईल ? माझ्या ? शक्यच नाही ! मी चांगला आहे ! स्वच्छ आहे ! मी असं घाणेरडं वागेनच कसं ? मोठेपणी असं काहीतरी करायचं असलं, तर मला–मला मोठं व्हायचंच नाही ! कधीच नाही. ( रडकुंडीला आलेला. )

वामन्या : ( त्याचं सांत्वन कसं करावं, हे न सुचून ) तुला....हे फुलपाखरू हवंय् ? बक्षीस, म्हणून !

राजा : नको. आणि पुन्हा असलं काही मला दाखवूसुद्धा नकोस !

[ वामन्या जाऊ लागतो. ]

राजा : वामन्या, तू हे सांगणार नाहीस ना कुणाला ? नानांचं नि चंद्राक्काचं ?

वामन्या : बिलकुल नाही. विद्येशप्पथ !

राजा : बघ हं...

वामन्या : अरे, सांगायचं काय त्यात ? गावात सगळ्यांना ठाऊकेय् !

[ राजा अवाक् होऊन त्याच्याकडे बघत राहतो. वामन्या 'मार कट्यार मर जाना' म्हणत निघून जातो. एवढ्यात, बाळ वरून उतरून अर्ध्या जिन्यावर येतो. ]

बाळ : ( एखाद्या गुप्त कामगिरीवर असल्याप्रमाणे ) श्श...राजा....श्श....

राजा : काय, रे ?

बाळ : ( तोंडावर बोट ठेवून ) श्श....हळूच ये.

[ राजा त्याच्या मागोमाग जिना चढून जातो. आता नानांची खोली प्रकाशते. दोघे आत येतात. बाळ दार लावून घेतो. ]

राजा : कशाला बोलावलंस ?

बाळ : हळू बोल. ( फडताळातून एक ब्रँडीची बाटली काढून दाखवतो. ) हे बघ काय ?

राजा : ब्रॅण्डी ?

बाळ : हो. नाना घेतात नं कधीकधी, म्हणून ठेवली असेल. नाहीतर औषधासाठी. आपण टेस करायची ?

राजा : आपण ?

बाळ : हो....काय हरकत आहे ? बघू या तर, कशी लागते, ते....

राजा : आणि नाना आले एवढ्यात, तर.... ?

बाळ : मार गोली. ते कशाला येणारेत आता ?

राजा : मग आण इकडे बाटली. ( बाळ बाटली देतो. ) घेऊ ?

बाळ : घे. घे. ( राजा तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटतो. ) पुटपुटतोयस काय ?

राजा : मारुतीस्तोत्र म्हटलं. म्हंजे पाप नाही लागत दारू प्यायल्याचं. तू पण म्हण....( बाळदेखील पुटपुटू लागतो. ) बाळ, तुला ' देवदास ' सिनेमा आठवतो का, रे ?

बाळ : थोडासा आठवतो. मी झोपलेलो पाहताना !

राजा : काय मस्त होता ! चिक्कार रडायला यायचं. तो देवदास कसा, दु:ख झालं, की आरामात दारू प्यायचा ! मी दारू प्यायलो, तर माझंसुद्धा दु:ख जाईल का, रे ?

बाळ : हॅं ! तुला कसलं दु:ख ? आत्ता तर मारामारी करत होतास !

राजा : तुला नाही समजायचं. तू लहान आहेस !

[ बाळनं टेबलाचा ड्रॉवर उघडला आहे. ]

बाळ : मला वाटलंच !...सिगार यात ठेवलेत नानांनी. ओढायचे ?

राजा : दु:खात सिगार ओढतात, की नाही, कोण जाणे ? पण बघू या ओढून !

बाळ : चंद्राक्काला वास आला, म्हंजे ?

राजा : चूळ भरायची न् बडीशेप खायची.

बाळ : तुला माहीताय् , कसे ओढायचे, ते ?

राजा : पाहू या तर, जमतंय् का. ( सिगार पेटवू लागतो. )

[ बैठकीची खोली प्रकाशते. नानासाहेब बाहेरून येतात. ]

नाना : चंद्राक्का....

[ ती दारात येते. ]

चंद्राक्का : हे काय ? एवढ्यातसे आलात ?

नाना : आज पेशंट्स् फार नव्हते. त्यातनं पाऊस आला. आता कोण येणारेय् मुद्दाम, पावसातनं ? म्हणून आलो झालं परत ! मी जातो वर. तू चहा पाठवून दे.

[ नाना जिना चढू लागतात.
इकडे मुलांनी सिगार पेटवून झुरके ओढलेले, आणि ब्रॅण्डीचे घुटके

घेतलेले. दोघांनाही असे काही ठसके लागतात, की ब्रह्मांड आठवतं. दोघेही खोकत सुटतात.
मुलं हातात बाटली आणि सिगार, अशा अवस्थेत खोकत असतानाच दारावर थाप पडते. मुलं चपापतात. दोघांचीही घाबी दणाणलेली. ]

नाना : ( बाहेरून ) कोण आहे आत ? दार कोणी लावलं ? लौकर उघडा... लक्ष्मण....अरे, कोण आहे आत ? चंद्राक्का, जरा वर ये ! लक्ष्मण– ....दार उघड....

[ राजा लटपटत्या पायांनी चालत जाऊन दरवाजा उघडतो.
नाना आत येतात. मुलांना आपल्या खोलीत आणि या अवस्थेत पाहून, ते विलक्षण चकित, आणि संतप्त. ]

नाना : तुम्ही ? माझ्या खोलीत ?....आणि हे काय ? फडताळातली बाटली काढलीत ? चोर...भामटे....( त्यांना मारू लागतात. )

[ हाका आणि गडबड ऐकून, चंद्राक्का धावत वर येते. दारातच उभी राहते. ]

नाना : साल्यांनो, दारू पिता ? सिगार ओढता ? शरम नाही वाटत, भडव्यांनो, या वयात हे असले धंदे करायला ?

राजा : ( मार खाता खाता, असहाय संतापामुळं, इतका वेळ त्याच्या मनात साचून राहिलेल्याचा स्फोट होतो. अचानक धीट होऊन) खबरदार ! ....खबरदार आमच्या अंगाला हात लावाल, तर....! आम्हांला एवढ्याश्शासाठी मारता...आणि रात्री तुमचे कसले धंदे चालतात चंद्राक्काबरोबर ?

[ नाना अवाक् होऊन मारायचे थांबतात.
चंद्राक्काही दिङ्मूढ होऊन राजाकडे पाहत असतानाच .. ]

प ड दा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. .................. नों. दि ..................
वि. .................. क्र. ..................

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ प्रकाशझोतात राजाभाऊ दिसतात. इझीचेअरमधे सिगार ओढीत बसलेले. ]

**राजाभाऊ** : आज विचार केला, तर माझं मलाही आश्चर्य वाटतं. त्या बाळवयात नानांचा एवढा धाक असताना, त्यांच्या तोंडावर, असं फाडकन् विचारायचा धीर मला झाला तरी कसा, कोण जाणे! कदाचित माझ्या मनात त्यावेळी जे विलक्षण काहूर माजलं होतं, त्याचाच तो स्फोट असेल! आता विचार केला, की हसू येतं. पण त्या साऱ्या गोष्टींचं ज्ञान मला पहिल्याप्रथम झालं, तेव्हा मात्र जीव कसा अगदी गलबलून गेला होता! काळ्याकुट्ट अंधारात....क्षणाक्षणाला खोल खोल होत जाणाऱ्या काळ्याशार पाण्यात आपण मनाविरुद्ध ढकलले जात आहोतसं वाटलं होतं. नंतर हळूहळू समजूत पटत गेली. या गोष्टी पूर्वीइतक्या भयानक वाटेनाशा झाल्या...असे दिवस चालले होते...आम्ही हळूहळू मोठे होत होतो. दोन वर्षं झाली. मी मॅट्रिकला गेलो...आणि याच दिवसांत मला एक नवीन गोष्ट माहीत झाली.. जी त्या पहिल्या गोष्टीपेक्षा अधिक भयंकर, अधिक दाहक होती....

[ बैठकीची खोली संपूर्ण उजळते. दुपारी बाराचा सुमार. लक्ष्मण शिकेकाई कुटत बसला आहे. चंद्राक्का आतून येते. दाराशी जाते, परत वळते. राजाभाऊ क्षणभर त्या दोघांकडे पाहून, निघून जातात. गेल्या वेळेपेक्षा, चंद्राक्काच्या पोशाखात खूपच फरक पडलेला. नऊवारी लुगडं जाऊन, त्या जागी झुळझुळीत छापील वायल आलेलं. तोंडाला पावडर लावलेली. केसांचा फॅशनेबल अंबाडा, त्यावर फुलांची वेणी. थोडक्यात, आपण अधिक चांगलं दिसावं, यासाठी

खटाटोप केलेला.

लक्ष्मण तिच्याकडे पाहत राहतो. मग पुन्हा शिकेकाई कुटू लागतो. ]

चंद्राक्का : ( तो आपल्याकडे पाहतोय , हे लक्षात येऊन ) बघतायस काय ?

लक्ष्मण : थाट बघतोय्...डॉक्टरीणबाईंचा.

चंद्राक्का : ( खोट्या रागानं ) लक्ष्म ऽ ण !

लक्ष्मण : का ? डॉक्टरीणबाई म्हटलं, म्हणून रागावलात ? सगळा गाव म्हणतो, ते चालतं ! तेव्हा हसून अश्शी मान उडवता !

चंद्राक्का : अरे, पण गावातलं गावात. घरात असं काहीतरी वेडंवाकडं बोल-लास, आणि ते साहेबांच्या कानांवर पडलं, म्हंजे ?

लक्ष्मण : हॅ हॅ, साह्यबांच्या समोर बोलायला मला काय वेड लागलंय् ? ( थांबून ) पण निघाला कुठं एवढा थाटमाट करून ?

चंद्राक्का : निघालेय् कुठं ? घरीच तर आहे !

लक्ष्मण : मग गोल साडी कशी नेसली ?

चंद्राक्का : बराच आहेस, रे ! घरात काय गोल साडी नेसूच नये, की काय, कधी ?

लक्ष्मण : नाही... पण ही जरा महागाची दिसते. साहेबांनी मुंबईहून आणली वाटतं !

चंद्राक्का : साहेबांनी नाही आणली.

लक्ष्मण : मग ?

चंद्राक्का : गाववाल्यानं दिली.

लक्ष्मण : कोणी ? त्या लंगड्यानं ?

चंद्राक्का : लंगडा काय म्हणतोस त्याला ? एका पायात थोडा दोष आहे, एवढंच.

लक्ष्मण : एवढी साडी दिली, म्हंजे भलतीच माया दिसतेय् तुमच्यावर.

चंद्राक्का : माझ्या गावचा आहे, म्हणून देतो ! दुसरं काय ? त्यालासुद्धा बिचाऱ्याला दुसरं कुणी नाही. ( दारापर्यंत जाते. लांबवर पाहून परत येते. )

लक्ष्मण : कोणाची वाट पाहताय् , जणू !

चंद्राक्का : चल्.... या वेळी कोण येणार ?

लक्ष्मण : हो ना...साहेब तर तीन वाजल्याशिवाय दवाखान्यातनं परत येणार नाहीत....

चंद्राक्का : तू असं कर, लक्ष्मण– गहू दळून आणायचाय्. डबा काढून ठेवलाय् . तो घेऊन जा बरं गिरणीवर.

लक्ष्मण : आत्ता ?

चंद्राक्का : हो, आत्ता.

लक्ष्मण : कशाला मला बाहेर घालवताय् उन्हाचा ? जराशानं जाईन.

चंद्राक्का : काही नाही. एकदा राहून गेलं, की राहून जातं. तू जा बरं आत्ताच. थांब.... मीच आणून देते तुला डबा. ( स्वैंपाकघरात जाते. )

[ लक्ष्मण कुटत असलेली शिकेकाई भरून ठेवतो. एवढ्यात, दारात बाळकू येतो. ]

लक्ष्मण : या.... या, वाटच बघताहेत मघापासून.

बाळकू : कोण ?

लक्ष्मण : डॉक्टरीणबाई, आणि कोण ? त्यांच्याकडेच तर तुमचं काम ! डॉक्टरांकडे असलं, तर तीननंतर या, नाहीतर आत्ता दवाखान्यात जा !

बाळकू : बरं बरं.... केव्हा यायचं न् कुठं जायचं, ते माझं मी पाहून घेईन. घरच्या नोकरमाणसानं त्यात नाक खुपसण्याची काही गरज नाही, समजलं ? तू आपलं काम कर.

लक्ष्मण : माझंच काम करतोय् . साहेबांचं घर राखण्याचं. घरात घुशी शिरल्या, तर एका फटक्यात तंगडं मोडून घालवून द्यायचं काम आहे माझ्याकडे. एक तंगडं आधीच मोडलं असलं, तर दुसरं.

बाळकू : थांब, हो. एवढी वाढलीय् का तुझी हुशारी ? चंद्रीलाच सांगतो, तुला घरातनं घालवून द्यायला.

लक्ष्मण : त्यांची हिंमत आहे का मला घालवायची ? आणि चंद्री कुणाला म्हणतोस ? चंद्राक्का म्हण.

बाळकू : आक्का–बिक्का आपण नाही जाणत. आपल्याला माहीतेय्, ती एक....

[ चंद्राक्का दळणाचा डबा घेऊन येते. ]

चंद्राक्का : लक्ष्मण... तू जातोय्स ना गिरणीत ?

लक्ष्मण : जातो. तुम्ही बसा गाववाल्याला घेऊन. पण त्याला म्हणावं, फार वेळ बसू नकोस. कधीकधी दुपारचे लौकर येतात साहेब. ( जातो. )

बाळकू : भलता आगाऊ दिसतोय् हा गडी. तू बरी चालवून घेतेस त्याची

हुशारी, त्याचे कान उपटायचे सोडून ?

चंद्राक्का : आपण जरा गोडीगुलाबीनं घ्यावं, बाळकू. उद्या तो साहेबांना सांगून बसला, म्हंजे ?

बाळकू : किती दिवस राहणारेय्स अशी, साहेबांना भिऊन ? एक ना एक दिवस....

चंद्राक्का : नको. ते नकोच, बाळकू.

बाळकू : नको म्हंजे ?

चंद्राक्का : म्हंजे, बाळकू, तू नकोच येत जाऊ माझ्यासाठी. मीदेखील कुठं यायची नाही तुझ्याबरोबर.

बाळकू : हे काय नवीनच काढलायस ?

चंद्राक्का : नवीन नाही. मला नेहमीच वाटतं, बाळकू, की आपण चुकतोय्. तू मला मोहात टाकलंस. मी देखील वेड्यासारखी वागले. पण यापुढं हे निस्तरणं कठीण जाईल.

बाळकू : ते मला नको सांगूस. फौजदारांना सांग. मी काय बापडा– नुसता त्यांचा निरोप्या. पण फौजदारांना काय सांगायचं, ते ठरवण्याआधी हे बघ. (कोटाच्या खिशातून एक लाल रंगाची पुठ्याची पेटी बाहेर काढतो. उघडून दाखवीत) हे फौजदारांनी पाठवलंय्.

चंद्राक्का : माझ्यासाठी ? (त्यातून एक मोत्याची नेकलेस काढून पाहत) किती छान आहे !

बाळकू : कल्चर्डमधला उंची माल आहे....घालून बघ !

चंद्राक्का : (हरखलेली.) खरंच घालू ?

बाळकू : खरंच, नाहीतर काय, पेटीची शोभा करायला का आणलीय् ? फौजदारांनी बजावून ठेवलंय्... आज चंद्रीला आणशील, ती नेकलेस घालूनच आण, म्हणून. चल आता लौकर.

चंद्राक्का : म्हंजे ? आत्ता बोलावलंय् ?

बाळकू : वेड पांघरू नकोस. निघायच्या तयारीत तर दिसतायस.

चंद्राक्का : तयारी केली होती, पण बाहेर पडायचं जिवावर येतं. रोज रोज असं बाहेर गेलं, म्हंजे लोकांच्या डोळ्यांवर येणार, रे....

बाळकू : बरंय्. बाहेर नसलं पडायचं, तर फौजदारांना इथं आणतो.

चंद्राक्का : भलतं बोलू नकोस. फौजदारांना इथं आणून, घराचा काय कुंटणखाना करायचाय् ?

बाळकू : उगाच मोठमोठे शब्द वापरू नकोस. तुझ्या–माझ्यासारख्यांना ते परवडत नाहीत.

चंद्राक्का (खिन्नपणे) शब्द कुठलेही वापरले, तरी म्हणायचं एकच ना शेवटी ?

बाळकू कशाला फुकट डोकं घासत बसल्येयुस? हे वय तुझं हौसमौज करण्याचं. समजायला लागण्याच्या आत, तुला या घराच्या चुलीत सारली, म्हणून इथंच का धुमसत जळणारेयुस ? आरशात बघतेस, की नाही, स्वतःचं रंगरूप ? ते असं लंकेची पार्वती बनून भाणसुरी नेसण्यासाठी का आहे ? फौजदार हौशी आहे.... तरणाबांड आहे.... आपल्या हातानं तुझ्या शरीराचं कोडकौतुक करायला धडपडतोय् तो ! त्याचा अपमान का करणारेयुस ?

चंद्राक्का (कळवळून) पण तसल्या चालीची बाई नव्हते, रे, मी आत्ता-पावतर !

बाळकू म्हणूनच मळकी लुगडी नेसून, बुच्च्या कानांनी दिवस काढीत होतीस ना ? बायो, त्या फौजदाराची काळीवाळकी बायको हिऱ्याच्या कुड्या घालून मिरवते, न् तू काय पाप केलंयुस, म्हणून कानांत हिरकुटाच्या काड्या घालतेस ? कसले तुझे गोरे गोरे कमळासारखे हात, आणि साध्या काचेच्या बांगड्या खुळखुळावतेयुस ! अगो, फौजदारान् तुझ्यासाठी लेडीज् घड्याळ सुद्धा घेऊन ठेवलंय् , हो.... मी या डोळ्यांनी पाह्यलंय् !

चंद्राक्का घड्याळ ? माझ्यासाठी ? बाये माझ्या !

बाळकू तुला माहीत नाही, त्याला तुझी किती नवलाई वाटते, ते ! तो तुला तसली बाई नाही समजत ! तसल्या पायजेत, तं विजयानंद थेटरामागे नायकिणी कमी का पडल्यायुत ? पण त्याला तुझ्यासारखा घरंदाज वाणच हवा ! तुला काय, तरुण आहेस, तोवर माल जमवा-यचा ! लक्षात ठेव, आता आढेवेढे घेत राहशील; पण एकदा वय झालं, की तुझे हाल कुत्रा खाणार नाही ! डॉक्टरांची पन्नाशी उलटली ! पुढं त्या पोरांच्या का तोंडाकडे बघणारेयुस, डॉक्टरांचं बरंवाईट झाल्यानंतर....

चंद्राक्का (एकदम ओरडून) बाळकू ! उगाच अभद्र बोलू नकोस. मला बोलायचं, तेवढं बोल. पण साहेबांच्याबद्दल काही वेडंवाकडं बोललास, तर खबरदार ! (थांबून) त्यांनी माझं काही कमी केलेलं नाही ! कानांतलं घ्या, रिस्टवॉच घ्या, म्हणून त्यांच्यापाशी हट्ट धरते, तर त्यांनी नाही नसतं म्हटलं ! पण मलाच नाही काही मागावंसं वाटत त्यांच्याकडे ! अरे, काय हक्क, रे, माझा ? कोण आहे मी त्यांची ?

म्हटलं तर, घरातली स्वैंपाकीणच का नाही ? त्यांनी शेजेला घेतलं, हाच माझा मान ! आणखी काय मागू मी त्यांच्याकडे ?

वाळकू : काही मागू नकोस. पण शेज तरी पुरती मिळतेय् का तुला ?

चंद्राक्का : ( धक्का बसून ) काय बोललास, वाळक्या, तू ?

वाळकू : खरं बोलून गेलो, म्हणून हादरलीस ! अजून तिशी नाही तू गाठलीस.... तुला ऐन जवानीतला फौजदारासारखा माजावरचा वळूच हवा ! डॉक्टरांची आता पन्नाशी उलटून गेली ! रोज धारोष्ण दूध पाजलंस त्याला, आणि बदाम खाऊ घातलेस, तरी किती दिवस समाधान देईल तो ? अजून तुझा जन्म जायचा आहे ! देहाची आग कशानं विझवणारेय्स ? नुसत्या आठवणींनी ? ( ती अवाक्. ) चल फौजदाराकडे. आता उशीर करू नकोस. तीन वाजताच्या आत परत यायचंय् ना ?

चंद्राक्का : हो.... पण ...

बाळकू : आता पण नि बिण करीत बसलीस ना, तर तुझा तो आखाडसासरा येईल गिरणीतनं परत... मग बसशील अडकून इथंच ... चल....

[ ती दोघं जायला निघतात, एवढ्यात राजा नि वामन्या येतात. ]

राजा : हे काय, तू कुठं निघालीस दुपारची ?

चंद्राक्का : राजा.... ! मधेचसा आलास शाळेतनं ?

राजा : मास्तर वारले ! तू कुठं जातीय्स, ते सांग आधी.

चंद्राक्का : मी ना.... मी....

बाळकू : मावशीला बघायला नेतोय् मी. त्या आजारी आहेत.

चंद्राक्का : अरे.... हे माझ्या गावचे आहेत.... त्यांची मावशी जरा.... ( राजाच्या नजरेनं भांबावून ) बघतायस काय ?

राजा : मोत्यांची नेकलेस् नवीन दिसतेय् गळ्यात....

चंद्राक्का : ( फारच गोंधळलेली. ) हो.... यानंच दिली.... कल्चर का काय, म्हणतात, तसली आहे....

राजा : नाना येतील आत्ता

चंद्राक्का : तोवर आलेच मी. पोळी न् डाळिंब्यांची उसळ ठेवलीय्.... भूक लागली असली, तर खाऊन घ्या तुम्ही दोघं.... मी येतेच आत्ता.... ( गडबडीनं जाऊ लागते. मग परत वळून ) राजा.... ( त्याला बाजूला घेऊन ) साहेबांना काही सांगायचं नाही बरं यातलं. उगाच

तारांगण करतील. त्यांना आवडत नाही माझ्याकडे नात्यातलं कुणी आलेलं.

राजा : नानांना आवडत नाही.... तर तू कशाला येऊ देतेस ?

चंद्राक्का : अरे, आलं कुणी, तं काय घालवून का द्यायचं ? ( लाडीगोडीनं ) नाही ना बोलणार त्यांच्याकडे ? बघ, हो.... माझी शप्पथ आहे.

राजा : शप्पथ सुटली ! पण नाही बोलायचा.

चंद्राक्का : शहाणा, माझा बाळ ! जाते हं.... ही आत्ता आले, बघ.

[ बाळकूबरोबर घाईघाईनं जाते. वामन्या मोठमोठ्यानं हसतो. ]

राजा : हसतोस काय ? इथं माझा जीव जायची पाळी आलीय्.

वामन्या : झालं ना सार्थक शाळा बुडवून आल्याचं ? अजून नसली झाली खात्री, तर सांग तसं. म्हंजे आकडेवाल्या फौजदाराच्या खिडकीतच नेऊन उभं करतो तुला....

राजा : पण हे चाललंय् काय, वामन्या ? मला तर कशाचा अर्थच समजत नाहीये....

वामन्या : अर्थ काय समजायचा ? रोज दुपारची ही अशी जाते— आकडे-वाल्याकडे.

राजा : कशाला ?

वामन्या : हळदीकुंकवाला ! आता एवढंसुद्धा तुझ्या डोक्यात शिरत नाहीये, का तुला समजूनच घ्यायचं नाहीये ? हवं तर आणखी स्पष्ट करून सांगतो. इथं नानांशी ती जशी वागते, तशीच तिथं त्याच्याशी वागते ! दररोज दुपारी तो तिचा नवरा.... !

राजा : नाही.... ! हे शक्यच नाही ! तू खोटं सांगतोस ! सगळं खोटं ! ती अशी वागेलच कशी ? दुसऱ्या पुरुषाकडे जाईलच कशी ? मला न् बाळला, ती आईच्या ठिकाणी आहे ! आईच्या ठिकाणी ! नाना आमचे वडील ! ती नानांशी वागते, तशी दुसऱ्या कुणाशी वागेलच कशी ?

वामन्या : तू आधी शांत हो पाहू, राजा ! शांत हो ! ( महत्प्रयासानं त्याला शांत करतो. प्यायला पाणी देतो. ) हे बघ, तू, हवं तर, हे सगळं विसरून जा ! मी तुला काही सांगितलं नाही न् तुला काही दिसलंच नाही ! नाहीतरी तुला–मला करायचंय् काय ? या गोष्टी मोठ्या माणसांच्या आहेत. त्यांची ती पाहून घेतील. तू कशाला काळजी

करतोस ?

[ राजा हळूहळू शांत झालेला. विचारात बुडालेला. ]

राजा : ( हलकेच ) वामन्या, हे सगळं.... चंद्राक्का कशासाठी करते ?
वामन्या : फौजदार तिला पैसे देतो, त्याबद्दल. सगळ्या वेश्या पैसे घेतात.
राजा : वेश्या ? चंद्राक्का वेश्या ? पण ती तर तसल्या वस्तीत राहत नाही ! ती आमच्या घरात राहते ! ( एकदम रडू लागतो. ) वामन्या, चंद्राक्का आमची आहे, रे ! ती वेश्या कशी असेल ?

[ मथूआत्या येते. ]

मथूआत्या : बरा भेटलास, राजा. घरात दुसरं कुणी नाहीये नं ?
राजा : तुम्ही नेहमी नानांच्या दवाखान्याच्याच वेळी येता, मथूआत्या.
मथूआत्या : अरे, सहज डोकावले जाताजाता. ती दिसली मधा रस्त्यावर. आता, राजा, तूच मला सांग, भर दुपारची ही गेली कुठं ? बरोबर एक छाकटासुद्धा होता !
राजा : तुम्हांला दिसली ना ? मग तुम्हीच विचारायचं तिला.
मथूआत्या : मी बसल्येय् विचारायला ! मला सटवीचं तोंडसुद्धा पाहायचं नाही.
राजा : मग मला कसं कळणार, ती कुठं गेली, ते ?
मथूआत्या : तुला, मेल्या, सग्गळं कळतं. उगाच केस ओढतोस डोळ्यांवर. पण एक दिवस डोळे पांढरे होतील, तेव्हा समजेल तुम्हां सगळ्यांना. पूर्वी घरातच भ्रष्टाकार होता, आता गाव बाटवत फिरतेय्. मी सांगते तुला, राजा, अजूनपावतर नाशकात अशी एक बाई नव्हती. ज्यांना धंदा करायचा, त्या सरळ त्या थेटरामागच्या वस्तीत जाऊन बसत. असं नव्हतं, हो, कोणी उजळ माथ्यानं वेसवेगिरी करीत हिंडत.
वामन्या : जाऊ दे, राजाच्या आत्या. आपल्याला काय करायचंय् ?
मथूआत्या : तू कोण ? या राजाचा मित्र ना ? मग शिकव, याला काही अक्कल. मेल्यांनो, हे चाललाय् काय ? नाशकात राह्यचंय्, का नाही, तुम्हांला ? आज फौजदाराबरोबर उडत्येय्....उद्या आणखी कोणाला चढवील नानाच्या पलंगावर.
राजा : ( असह्य होऊन ) मथूआत्या, असलं काही बोलायचं असेल, तर

इथं येत जाऊ नका !

मथूआत्या : वा, रे, मी तुम्हांला सावध करायला आले, तं माझ्यावरच गुरकावतोस ? एवढी धिटाई आहे, तं तिलाच काढावं, हात धरून घराच्या बाहेर.

राजा : हे तुम्ही....नानांना सांगा !

मथूआत्या : मी कशाला सांगू ? त्याला काय समजत नाहीये ? घे म्हणावं.... अगदी साफ डोळे मिटून घे ! पुरतं धुपवलंन् तिनं....की चांगलं कळेल ! पण तिला जाब विचारायला, त्याला तोंड आहे कुठं ? तुझी आई गेली, तेव्हा मी सांगत होते, की सरळ लग्न कर, मुलगी पण होती माझ्या पाहण्यात. बिजवर, तं बिजवर; पण घर चांगलं आहे, म्हणून तयार केलीन् होती तिच्या आईबापांना. तेव्हा म्हणला, पोरांना सावत्र आई नको....हे थेर करायचे होतं नं मनात ? ही बया घरात आली, तेव्हाच मी खूणगाठ बांधली होती. नटवी ! पावडर काय लावाच्ची न् फुगे काय काढाच्ची ! सटवे ! सोवळी ना, गो, तू ! न् कशाला ही थेरं ? तेव्हा कोणी नव्हतं विचाराला झडझडावून....पण आता ही दिसताहेत ना, ती त्याचीच फळं बरं ! आता घ्या....चांगली उकिरडा हुंगत फिरतेय् शिंदळीची !

[ दारात नाना उभे. शेवटचं वाक्य त्यांनी ऐकलेलं. ]

नाना : मथे....कोणाचा उद्धार चाललाय् ?

राजा : ( घाबरून ) नाना !

मथूआत्या : लौकर बंद केलास वाटतं आज दवाखाना ?

नाना : तुम्ही दोघे....या वेळी इथं कसे ?

वामन्या : त्याचं काये.... ( दोघे एकमेकांकडं बघतात. ) म्हणजे....आम्ही....

नाना : काय विचारतोय्, राजा ? शाळेला दांडी मारलीत ना ?

राजा : नाही....म्हंजे....

नाना : ततपप करू नकोस. खरं सांगून टाक. नाहीतर फटके बसतील. शाळा चुकवून घरी का आलास ?

राजा : माझ्या....माझ्या जाम पोटात दुखायला लागलं. म्हटलं....वाटेतच काय होईल, काय नाही ! म्हणून याला घेतलं बरोबर.

नाना : पोटात दुखत होतं ? जंत झाले असतील—थांब ! जुलाबाची गोळी देतो.

राजा : नको... आता बरं वाटतंय्. म्हणत असलात .... तर परत जातो शाळेत.

नाना : कशाला ? वाटेल तेव्हा जायला ती शाळा आहे, का धर्मशाळा ? लक्षात ठेव. या वेळेस सोडून देतोय्. पुन्हा शाळेला दांडी मारल्याचं कळलं, तर दोन दिवस उपाशी ठेवीन. समजलास ? पाणीसुद्धा मिळायचं नाही !....( वामन्याला ) आणि तुम्ही, हो ? मित्राबरोबर तुम्हीसुद्धा अक्कल गहाण ठेवलीत वाटतं ? पुन्हा दांडी मारलीस, तर बघ, तुझ्या बापाला कळवल्याशिवाय राहतो का, ते ! ( वामन्या मुंडी हलवून जाऊ लागतो. ) इकडे ये...इकडे ये....डोक्यावर ती छपरं वाढलीयृत, ती कापायला बापाजवळ पैसे नसले, तर माझ्या-कडनं घेऊन जा....समजलास ? पळ आता....

[ वामन्या पळ काढतो. ]

मथूआत्या : हे असलंच तुझं ज्याला त्याला लागट बोलणं ! असंच बोललास माझ्या शिरीला !...त्या भवानीला मात्र चार गोष्टी सांगायला तुझी जीभ उलटत नाही !

नाना : कुणाबद्दल बोलतेयृस !

[ राजा एकदा नानांकडे पाहतो, आणि दप्तर उचलून आतल्या खोलीत जातो. ]

मथूआत्या : वेड पांघरू नकोस. चंद्री कुठं जाते, काय करते, हे जसं तुझ्या कानांवर येतच नसेल !

नाना : कुठं जाते ?

मथूआत्या : मला नाही ठाऊक. तूच विचार तिला. पण लोक म्हणतात, तिची चाल चांगली नाही.

नाना : ( एकदम संतापून ) कोण भोसडीचे म्हणतात, त्यांना घेऊन ये माझ्यासमोर ! एकेकाची जीभ छाटून नाही दिली हातावर, तर....

मथूआत्या : कोणाकोणाच्या जिभा छाटणारेयृस ! सगळा गाव बोलतोय्.

नाना : गाव गाव म्हणजे काय, मथे ? मूर्खांचा न् आचरट बाजारबुणग्यांचाच ना गाव ? त्यांना कुणाचं बरं झालेलं बघवणारेय् ? माझी डॉक्टरकी सुखानं चालल्येय्, सावकारी सुरू केल्येय्, चार पैसे मिळताहेत, ते

लोकांना बघवत नाही, म्हणून बसतात काड्या घालत. दुसरं काय ? मला नको ऐकवू त्यांचं शहाणपण.

मथूआत्या : लोक खोटं सांगतात, तर आत्ता....या क्षणी कुठं गेलीय् ती ? सांग बघू ?

नाना : कुठं गेलीय् ?

मथूआत्या : वसपटू नकोस. पाहिलं, ते सांगते. एका छाकट्यावरोबर गेली कुठंशी. विचार, हवं तर, राजाला.

नाना : राजा....( राजा येतो. ) चंद्राक्का कुठं गेलीय् ?

राजा : तिच्या गावचा कोणीतरी नातेवाईक आला होता. त्याची मावशी आजारी आहे, तिला बघायला....

नाना : पाहिलंस ?....आणि तू घाणेरडे संशय घेतेय्स. तुझ्यासारखाच सगळा गाव !

मथूआत्या : अरे, या पोराला तिनं काय वाट्टेल ते सांगितलं असेल....

नाना : हे बघ, मथे, मी चंद्राक्काला गेली नऊ वर्षे ओळखतोय्. माझा सगळ्या गावापेक्षा तिच्यावर अधिक विश्वास आहे !

मथूआत्या : विश्वास आहे म्हणतोस, तं तिचा बदललेला अवतार नाही तुला दिसत ? अरे, तिची पातळं बघ, फॅशनी बघ, टाकमृटिकली बघ.... यासाठी पैसे कुठनं येतात तिच्याकडे ? गावात धंदे करूनच का नाही ?

नाना : ( ओरडून ) मथे... ! तिला.... पैसे....मी देतो !

[ राजा नानांकडे चमकून पाहतो. मथूआत्याही चकित. ]

नाना : देवाच्या दयेनं माझं घर उत्तम चाललंय्. मग घरासाठी खपणाऱ्या बाईच्या हातात चार पैसे द्यायला नकोत ?

मथूआत्या : जाते मी. तूच जर डोळ्यांना झापडं लावून तिची बाजू घ्यायला लागलास, तर मी कोण बोलणारी ? तुझ्या संमतीनंच तिचे चाळे चालत असतील, तर खुशाल चालू देत. एक दिवस घर पेटेल, तेव्हा समजेल !...( तावातावानं जाते. )

राजा : नाना....

नाना : काय ? काही डिफिकल्टी आहे का अभ्यासात ?

राजा : नाही.

नाना : मग चुळबूळ कशाला चाललीय् ? ( थांबून ) तिमाहीत वाईट मार्क

मिळाले तुला. असं चालायचं नाही मॅट्रिकच्या वर्षी. मॅट्रिकच्या रिझल्टवर पुढचं सगळं अवलंबून ! माझ्यासारखा डॉक्टर होणायूरेस ना तू ?

राजा : माझा हल्ली....अभ्यासच होत नाही, नाना.

नाना : अभ्यास न व्हायला काय झालं ? अलीकडे बघतोय् मी....लांब चेहरा करून काळजी करीत बसलेला असतोस. एवढी कसली काळजी पडल्येय् ? परीक्षेची ?

राजा : परीक्षेची नाही.

नाना : मग ?

[ दळणाचा डबा घेऊन लक्ष्मण येतो. स्वैंपाकघरात जातो.]

राजा : नाना, तुम्ही खरंच पैसे देता चंद्राक्काला ?

नाना : कशाबद्दल ?

राजा : आत्ता....तुम्ही मथूआत्याला सांगत होता, ते....चंद्राक्काला चैन करायला पैसे ...

नाना : त्याची तुला कशाला पंचाईत ? देत असेन, नाही तर नसेन. या असल्या काहीतरी गोष्टी घेतोस डोक्यात, म्हणूनच तुझा अभ्यास होत नाही.

राजा : पण, नाना....

नाना : सांगितलं ना एकदा, या मोठ्यांच्या भानगडीत तू पडू नकोस, म्हणून ? जा आता....अभ्यास कर.

[ राजा नाइलाजानं जातो.
नाना क्षणभर डोकं धरून उभे राहतात. डोकं जसं काही आतून फुटत असावं, तसे. मग लक्ष्मण डबा ठेवून बाहेर येतो. ]

लक्ष्मण : डोकं दुखतंय्, जणू.

नाना : ( पकडले गेल्याप्रमाणे ) नाही....विशेष नाही.

लक्ष्मण : चेपून देऊ का ?

नाना : नको, म्हटलं ना ? तू जा आपल्या कामाला.

लक्ष्मण : आज लौकर आलात ? पेशंटं नव्हती वाटतं जास्ती ?

नाना : होते एकदोघे. त्यांना उद्या यायला सांगितलं.

लक्ष्मण : म्हंजे ? सांजचं पण जाणार नाही ?

नाना : नाही. आज मनच थाऱ्यावर नाहीये. हे पेशंट्‌ससुद्धा भयंकर असतात एकेक ! डॉक्टरच्या तब्येतीची यांना काळजी ! काहीतरी विचारत बसतात !

लक्ष्मण : काय विचारतात ? चंद्राक्काचं ?

नाना : ( चमकून ) तुला काय माहीत ?

लक्ष्मण : साहेब, चंद्राक्कांकडे हल्ली एकजण येतो. लंगडा बाळकू. त्याच्यासंगती बाहेर जातात त्या.

नाना : ( ओरडून ) लक्ष्मण ! चंद्राक्काच्या वागण्याविषयी एक अक्षर ऐकायचं नाहीये मला.

[ त्यांचं ओरडणं ऐकून राजा खोलीच्या दारात येतो. ]

नाना : घरात कोण येतं, कोण जातं, याचा विचार करायला घराचा मालक समर्थ आहे ! गडीमाणसांनी बोलायचं काम नाही !

लक्ष्मण : चुकलं, साहेब. पुन्हा नाही बोलणार !

नाना : नुसतं बोलणार नाही, असं नको. लोकांचं वेडंवाकडं बोलणं ऐकायचं सुद्धा नाही. अरे, या नाशकात, तुला ठाऊकेय्, सगळ्या बायकांनी खुराड्यातच राहायला हवं. एखादी जरा दिसायला बरी असली, जरा नीटनेटकी राहिली, की उठवलीच तिच्याविरुद्ध राळ !

लक्ष्मण : खरंय्, साहेब.

नाना : मी वर आहे. नंतर चहा केलास, की घेऊन ये.

[ घाईघाईनं वर जातात.
लक्ष्मण आत जाण्यासाठी वळतो. तोच राजा पुढं होतो. ]

राजा : लक्ष्मण....

लक्ष्मण : तुम्ही इथंच होता होय, राजाभाऊ ?

राजा : नाना तुझ्यावर उगीच रागावले, नाही, रे ? तू घरचा माणूस, म्हणून काळजी करतोस. पण नाना तुला गडीमाणूस म्हणाले ! ( त्याच्या डोळ्यांत पाणी येतं. )

लक्ष्मण : खुळे, की काय तुम्ही, राजाभाऊ ? माझ्यासाठी रडता ? ( त्याचे डोळे पुसत ) अहो, नानांचं मन मला कळत का नाही ? त्यांनी चार

शिव्या दिल्या, तरी त्या मला लागायच्या नाहीत.

राजा : पण ते तरी अशी उडवाउडवी का करतात ? आपण खरं सांगायला गेलो, तर ऐकूनच घेत नाहीत. मथूआत्याला तर चक्क खोटं सांगितलं त्यांनी, आपण पैसे देतो, म्हणून. असं का ?

लक्ष्मण : का, ते तुम्हांला मोठेपणी कळेल, राजाभाऊ...ही असली दुःखं भारी अवघड ! नानांसारखा माणूस ती अंगावर काढतो....दुसऱ्या कुणाकडे बोलून दाखवत नाही....कुणी बोललं, तर त्याच्यावरच उलटतो ! पण आपण ओळखावं—हा माणूस दुसऱ्यावर नाही तापलेला...तो भांडतोय् स्वतःशीच ! झगडतोय् ! कशापायी झगडतोय् ? तर भीतीपायी !

राजा : भीती ? मोठ्या माणसांना कसली भीती ? भीती वाटायला ते काय लहान आहेत ?

लक्ष्मण : नाय, राजाभाऊ. भीती प्रत्येकाला वाटते. फक्त लहानाची भीती वेगळी, न् मोठ्याची वेगळी ! लहानाला भीती काळोखाची... भुताची ! झुरळा—बेडकाची ! मोठ्यांना भीती कसली, सांगू का ? मोठ्यांना भीती...जे सत्य असतं, त्याची.

**का ळो ख**

## प्रवेश दुसरा

[ संध्याकाळची वेळ.
राजा एका कोपऱ्यात पुडीची शाई तयार करीत बसलेला.
अचानक कुठूनशी येऊन, आई त्याच्याजवळ शिवीत बसते. ]

राजा : ( दचकून ) आई...? तू कधी आलीस ?

आई : केवढ्यानं दचकलास ! अरे, मी काही अचानक का आलेय् ? इथंच तर असते नेहमी. तुझ्या आसपास.

राजा : माझ्या एकट्याच्याच ! बाळ म्हणतो, तू त्याला कध्धीच भेटत नाहीस.

आई : अरे, तो किती लहान होता, मी गेले, तेव्हा! त्याला मी कुठची आठवायला? आणि त्याला बघ, माझी तेवढी गरजदेखील नाही. तो काही तुझ्यासारखा, जे ते मनाला नाही लावून घेत. आता सांग बरं, आज माझी आठवण कशाला काढलीस?

राजा : नको....सांगितलं, तर तू हसशील.

आई : नाही हसायची. सांग तं खरी.

राजा : मी नं, लग्न करायचं ठरवलंय्.

आई : कुणाशी? आपट्यांच्या गुलबकावलीशी?

राजा : (विलक्षण चकित.) तुला काय माहीत?

आई : पुढं तर सांग....

राजा : आणि लग्न झाल्यानंतर मी इतरांच्यापेक्षा अगदी वेगळा वागणार.

आई : वेगळा....म्हंजे?

राजा : म्हंजे, वामन्या म्हणतो, तसा काही चावटपणा मी करणार नाही. मी कुणाला सांगणारसुद्धा नाही, आम्ही नवरा-बायको आहोत, म्हणून; नाहीतर लोक उगाच चावट अर्थ घ्यायचे.

आई : बरं. तिला एका मखरात ठेवून रोज तिची पूजा कर. पण मला विचारशील, तर तू पडतोसच कशाला, या लग्नाच्या भानगडीत?

राजा : वा, ग, वा...आणि आपट्यांनी दुसऱ्याच कुणाबरोबर तरी गुलबकावलीचं लग्न लावून दिलं, म्हंजे? तो दुसरा माणूस तिचा गैरफायदा घेऊन तिच्याशी चावटपणा करायला लागला, तर? मला नाही ते सहन व्हायचं.

[आई नाहीशी झालेली. समोर चंद्राक्का उभी. तिच्या हातात एक छोटीशी तसबीर, पाठीमागे धरलेली.]

चंद्राक्का : कुणाशी बोलतोय्स्, राजा?

राजा : कुणाशी नाही. तुला काय करायचंय्?

चंद्राक्का : अलीकडे फार वाढलीय् तुझी स्वतःशी बडबडण्याची सवय. अभ्यासाचा ताण पडतो वाटतं?

राजा : नाही. तू कशाला आलीस? जा बरं आपल्या कामाला.

चंद्राक्का : (त्याच्या उद्धटपणाकडे दुर्लक्ष करून, त्याला तसबीर दाखवत) मी दाखवायला आलंते, हा फोटो. अडगळीत सापडला मला. तुझा न् बाळचा आहे, मुंजीतला. असा अडगळीत कशाला टाकलात? किती

छान आहे ! ( पुन्हापुन्हा पदरानं पुसते. )

राजा : ( तिच्याकडून तसबीर खस्सकन् ओढून घेत ) तू हात नको लावूस माझ्या फोटोला. मी लावीन तो माजघरात.

चंद्राक्का : ( खिन्न होऊन ) राजा.... हल्ली फार तोडून वागतोस तू माझ्याशी.

राजा : तसं तुला वाटायचंच.

चंद्राक्का : वाटेल वरं ? खरं ते सांगतेय् ! बाळ लहान आहे.... तो अजून पूर्वी-सारखंच वागतो माझ्याशी. पण तुला वाटतं.... आपण आता मोठ्ठे झालो. आता मॅट्रिकला बसणार ! चंद्राक्कासारख्या अडाणी बाईशी आपण कशाला बोलावं ? म्हणून बदललंस तू वागणं.

राजा : वागणं माझं नाही बदललं, चंद्राक्का. तुझं बदललंय्.

चंद्राक्का : माझं ? मी काय करतेय् ?

[ एवढ्यात बाळकू येताना दिसतो.
तशी चंद्राक्का घाईघाईनं दाराशी जाते. ]

चंद्राक्का : बाळकू.... ( राजाकडे पाहते. तो लक्ष नसल्यासारखं दाखवतो. ) भलत्या वेळी कशाला आलास ?

बाळकू : तशीच नड होती....

चंद्राक्का : पैशाची ?

बाळकू : नाही. फौजदारसाहेबांनी आठवण काढली होती !

चंद्राक्का : आत्ता ? नाही, नाही.... आत्ता नाही मला बाहेर पडता येणार. साहेबांची घरी यायची वेळ झालीय् !

बाळकू : अग, पण आत्ताच तर फौजदारांकडे खरी गंमत आहे ! कलेक्टरां-साठी खास पार्टी ठेवल्येय्.... ( अंगठा तोंडाला लावून ).... याची ! कोंबडीसुद्धा कापणारेयत !.... तू नसून कसं चालेल तिथं ? त्यातनं आज फौजदाराची बायको गेलीय् माहेरी ! सगळी सरबराई तूच करायच्येस.... अगदी यजमानणीच्या थाटात !

चंद्राक्का : मी नाही येणार, बाळकू.... तू जा....

बाळकू : असं, वाटेल तेव्हा, नाही सांगायला, फौजदाराला तू काय दारा-वरचा भिक्षेकरी समजलीस ? संतापला, तर तो चाबकानं फोडून काढील, इतका वाईट आहे !.... त्यातनं आजची गोष्ट वेगळी आहे ! आज तो तुला बोलावतोय्, तो एकट्या स्वतःसाठी नाही !.... ( डोळे मिचकावून ) अग, कलेक्टर यायचाय्, म्हटलं ना मी ?

चंद्राक्का : बाळकू !.... तू मला समजलास काय ?

बाळकू : बघ !.... कलेक्टराची मर्जी संपादन केलीस, तर कुठल्या कुठं जाशील !.... त्यातनं हे फौजदाराच्या संमतीनंच...

चंद्राक्का : मला माहीतेय्, बाळकू.... आज ना उद्या फौजदार मला याच रस्त्याला लावणार !.... आज कलेक्टर, तर उद्या फारिष्टर, न् परवा मुसारीसुद्धा ! तो सांगेल, ते मी ऐकायचं; नाहीतर तो मला फोडून काढणार ! मला ठाऊकेय्, बाळकू, तो मला तसलीच बाई समजतो ! गावात माझ्याविषयी तो असंच अरबट चरबट बोलतो !.... आणि तरी मी आपली भलत्या मोहात सापडून, तो बोलावील, तेव्हा त्याच्याकडे धावत जाते.... !

बाळकू : जातेस ना ? झालं तर मग !.... मग आत्ताच कशाला बसलीस विचार करीत ?

चंद्राक्का : आता आले, तर कायमचं घराबाहेरच राहावं लागेल !.... सांगितलं ना तुला ? साहेब कधीही घरी येतील ! तू सुद्धा राहू नकोस इथं.... नीघ !

बाळकू : ( तिच्या खांद्यावर हात ठेवीत ) मग, जाऊच म्हणतेस ?

चंद्राक्का : ( राजा बघत नाहीये ना, इकडे नजर टाकून त्याचा हात बाजूला करीत ) जा... जा, म्हणते ना !

बाळकू : ( पुन्हा, चेंगटपणानं, तिचा दंड धरीत ) फौजदार काय म्हणेल, याचा विचार केलास ना ?

चंद्राक्का : तुझ्या पाया पडते, बाळकू, तू आधी इथनं जा– नाहीतर मला घरातनं उठावं लागेल ! जा ना....

बाळकू : आत्तापुरती काढतो त्याची समजूत...पण नेहमी नेहमी असं झालं, तर.... परिणाम चांगला नाही व्हायचा. ( जातो. )

चंद्राक्का : ( राजा पाहत होता, या जाणिवेनं अस्वस्थ. ) गाववाला म्हणून जवळ केला.... तर वाट्टेल तेव्हा येतो ! ( तो तिच्याकडे नुसताच पाहत राहतो, त्याला ) काही म्हणालास ?

राजा : नाही.

चंद्राक्का : जा सांगितलं, तर जाईचना. लोचट मेला ! पाहिलंस ना तू ?

राजा : पाहिलं.

चंद्राक्का : ( भांबावलेली. ) मग मी तरी काय करणार, अशा वेळी ?

राजा : कशाला आला होता तो ?

चंद्राक्का : तो ना... तो... ( एकदम सुचून ) पैसे मागायला.... कर्जाऊ–

साहेबांकडनं...

राजा : मग....?

चंद्राक्का : मी म्हटलं.... बघू या.

राजा : खोटारडी! पैसे मागायला आला होता तो?... खोटं बोलतेस?

चंद्राक्का : (रडकुंडीला येऊन) नाही, रे! मी खोटं नाही सांगत!

राजा : नाही कसं? नुसतीच खोटारडी नाहीस.... मूर्खही आहेस तू! ही ....असली हलकी माणसं तुझ्याशी वाट्टेल ते चाळे करतात... न् तू ते चालू देतेस! फसवतेयूस तू नानांना! लुच्ची!....

चंद्राक्का : नाही, रे, राजा.... असं नको बोलूस! मी कशी फसवीन साहेबांना? मी कोण आहे? मला त्यांच्या पायातल्या वहाणेची तरी किंमत आहे का, रे? (रडत रडत निघून जाते.)

[ती गेली, त्या दिशेकडे राजा क्षणभर पाहत राहतो. एवढ्यात बाळ येतो.]

बाळ : बघतोयूस काय?

राजा : (उखडून) काही नाही. तू नुसता खेळ सबंध दिवस. मग इकडे घरात काय वाट्टेल ते होऊ दे.

बाळ : काय झालं? उगाच चिडाचीड भारी करतोस तू हल्ली.

राजा : लहान नाहीस आता तू. माझ्याहून अवघ्या दोन वर्षांनी लहान! पण जबाबदारी तुला काडीची समजत नाही!

बाळ : एहेरे, आणि तुम्ही मोठे जबाबदारीचे डोंगर उपसत असता! सबंध दिवस अस्सा सुतकी चेहरा करून चंद्राक्कावर पाळत ठेवली, म्हंजे काय मोठा झेंडा लावला वाटतं?

[चंद्राक्का तांदळाचं फुलपात्र घेऊन बाहेर येते.]

चंद्राक्का : मी देवाला जाऊन येते....

बाळ : लौकर ये. नाना येतील.

[ती काही न बोलता जाते.]

राजा : तुला वाटत नाही, बाळ, आपण काहीतरी करायला हवं, असं?

बाळ : वाटतं ना ! कशाबद्दल ?
राजा : चंद्राक्काबद्दल.
बाळ : तिचं काय ?
राजा : अरे, लोक काय बोलतात तिच्याविषयी, ऐकलंस का ?
बाळ : हो. लोक तिला डॉक्टरीणबाई म्हणतात. नानांची बायको म्हणतात. ती तुमची आई का, असंसुद्धा आपल्याला विचारतात.
राजा : ते नाही मी म्हणत. ते आता नाशकात सगळ्यांना ठाऊक आहे. पण तेवढंच नाही....दुसरंसुद्धा आहे....त्याहीपेक्षा भयंकर....
बाळ : भयंकर काय ? ती आकडेवाल्याला लागू आहे—हेच ना ?
राजा : हे सगळं तुला ठाऊक आहे ? आणि हे असले शब्दसुद्धा ?
बाळ : कधीपासूनच माहीत आहेत. तुला असलं बोललेलं आवडत नाही, म्हणून मी तुझ्यासमोर बोलत नाही, एवढंच !
राजा : आपण नानांना वाचवायला हवं, बाळ, या चंद्राक्काच्या संकटातनं.
बाळ : अरे...पण आपण लहान मुलं. आपल्याला काय समजतंय् ? ती मोठी माणसं...त्यांचं ती बघून घेतील.
राजा : बघून काय घेतील ? यात अब्रू जातेय्, ती आपल्या वडिलांची. हे नाशकातले एवढे मोठे डॉक्टर—आणि यांच्या घरात हे असं चालतं, म्हणून लोक बोटं दाखवतात ! तू काहीही म्हण—पण मी हे फार दिवस चालू देणार नाही !
बाळ : म्हंजे काय करणार आहेस ? चंद्राक्काला कोठीच्या खोलीत कोंडून ठेवणारेयस ?
राजा : मी सरळसरळ नानांशी बोलणार आहे !
बाळ : बोल, पण मला वाटतं, आपण नये ढवळाढवळ करू.
राजा : हा शहाणपणा नाही, समजलास ना ? भेकडपणा म्हणतात याला. इकडं घराला लागलीय् आग—आणि तू बैस स्वतःची कातडी सांभाळत.
बाळ : बरं, बरं....तुम्ही दाखवा काय ते शौर्य ! दाखवा बोलून नानांपुढे.... न लटपटता !

[ नाना येतात. आज ते क्लबमधून पिऊन आलेत. त्यांना थोडी जास्तच झालीय्. ते आपल्याच तंद्रीत बोलत आहेत. पण हे बरळणं नव्हे. मनातले विचार मोठ्यानं बोलावेत, तसं हे आहे. मुलं समोर आहेत, याचं त्यांना फारसं भान नाही. ]

नाना : कोण, साले, बोलतात, त्यांना म्हणावं, एकेकानं पुढं या ! पाठीमागे कशाला बोलता ? काय म्हणायचं असेल, ते तोंडावर म्हणा ! नामर्द म्हणा, हसा, थुंका; पण काय ते सगळे आमनेसामने होऊ द्या. रांडेच्यांनो, पाठीमागनं वार करू नका !

[ मुलं घाबरलेली. ती धावत आत जातात. ]

नाना : मात्र बोललात, कुजबुजलात, बोटं दाखवलीत, तरी मला कळल्याशिवाय राहत नाही, बरं का ! म्हणावं, लेको, या नाना आचवलाच्या पाठीला डोळे आहेत ! एकेकाला बरोबर टिपून काढीन ! काय म्हणायचंय् तुम्हांला ?....माझी बाई माझ्या ताब्यात नाही ! तिचे बाहेर संबंध....म्हणा, म्हणा ! आता का गप्प ? मी सांगतो ना, म्हणा, म्हणून ! होऊन जाऊ द्या, एकदाच काय ते ! सालं, पांघरूण पांघरूण तरी किती घालायचं ? एकदा दिसू द्या जगाला आमचं नंगेपण !

[ राजा आणि बाळ, लक्ष्मणला घेऊन येतात. स्वतः घाबरून लांब उभे राहतात. ]

लक्ष्मण : साहेब...

नाना : आता कशी ? आता आलात ना पाय चाटायला, साहेब, साहेब म्हणून ? साले, कुतरे कुठले !

लक्ष्मण : साहेब...मी लक्ष्मण....

नाना : हो....लक्ष्मण ! सॉरी हां, मी पहिल्यांदा तुला ओळखलंच नाही. ( किंचित ओशाळलेले. ) त्याचं काय आहे, लक्ष्मण....आज आम्ही क्लबमध्ये गेलो होतो....थोडी दारूसुद्धा घेतली. म्हटलं, जाऊ दे, साला....एक दिवस मोकळं व्हायचं ! लेट् गो ! बंधनं बंधनं तरी किती, रे, स्वतःवर ? जवळच्या माणसांचं बंधन ! दूरच्या लोकांचं बंधन ! औषधाच्या डोसासारखा, तासातासाला, त्याच कडवट दुःखाचा घोट गिळायला हवा ! पण आज म्हटलं, नो....! आज सगळं काही जहन्नममधे जाऊ द्या ! लेट् गो !

लक्ष्मण : साहेब....वरती चला.

नाना : डोन्ट वरी ! मला तसं काही झालेलं नाही ! आयॅम् ऑल् राइट....

आयॅम् कम्प्लीटली ऑल् राइट ! ( मुलांना, हळुवारपणे ) राजा.... अभ्यास झाला ? ( राजा गप्पच. बाळला ) भूक लागली असली, तर जेवून घे. सांग चंद्रा....( एकदम शहारून ) ओः गॉड ! किती सहन करायचं ?....गेट दी टु अ ननरी...गो, फेअरवेल् ! हे काय, माहीतेय् का, पोरांनो ? हॅम्लेट !.... हॅम्लेट वाचा. सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतील. ( राजाला ) हॅम्लेट वाचलंय् ?

**राजा** : ( भीतभीत ) नाही.

**नाना** : नाही ? हात् तुझी ! मॅट्रिकपर्यंत आलास, आणि अजून हॅम्लेट वाचलं नाहीस ? काय शिकवतात, रे, शाळेत ? आम्ही शाळेत असताना तोंडपाठ केलं होतं हॅम्लेट....आणि स्पर्धांमध्ये ते म्हणून दाखवून बक्षिसं जिंकली होती. अजून पाठ आहे...गेट दी टु अ ननरी, गो, फेअरवेल् !...बरं का, रे, हॅम्लेट म्हणून एक राजपुत्र असतो....त्याची आई निघते व्यभिचारी....बापाला ठार मारते... आणि पोरगा विचार करकरून खलास होतो....

*ऑर, इफ दाऊ विल्ट नीड्स, मॅरी अ फूल,*
*फॉर वाइज मेन नो वेल् इनफ् व्हॉट मॉन्स्टर्स यू मेक ऑफ देम्*

समजलं ? नसेलच. तुमची, साल्यांनो, इंग्लिशची बोंब ! हॅम्लेट म्हणतो, आपल्या प्रेयसीला....बाई ग, संन्यास घे ! आणि नसलाच घ्यायचा, अगदी अडलंच असलं लग्नावाचून, तर मूर्खाशी लग्न कर ! कारण शहाण्या माणसाच्या ताबडतोब लक्षात येईल, की तू त्याचा राक्षस करून टाकलायस ! राक्षस !...बायका, पुरुषांची खुळी बाहुली तरी करतात....नाहीतर त्यांचे राक्षस तरी करून टाकतात ! शेक्सपिअरनं कधीपासून इशारा देऊन ठेवलाय् ! आम्हांला हॅम्लेट तोंडपाठ....पण त्यानं दिलेला इशारा मात्र कधी कळला नाही ! ( राजाला ) कसला विचार करतोयस ? जास्त विचार करू नकोस ! नाहीतर हॅम्लेट होऊन जाशील ! व्यभिचारी आईचा हॅम्लेट ! ( बाळला ) तुम्हीसुद्धा अजिबात विचार करू नका ! खा, प्या, मजा करा, आणि एक दिवस खुळे व्हा !....नाहीतर राक्षस व्हा ! ( एकदम ) जेवलात ?

**बाळ** : नाही अजून.

**नाना** : का नाही ? मघा मी म्हटलं होतं ना, जेवून घ्या, म्हणून ? मग...?

**बाळ** : चंद्राक्का आली, की वाढेल.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०५८४ नों. दि. २१७७।८७

नाना : आली की ?...म्हणजे गेलीय् कुठं ?

राजा : देवळात गेलीय्. येईल आत्ता.

नाना : ( एकदम चिडून ) खरं सांग, राजा, चंद्राक्का कुठं गेलीय् ?

राजा : खरंच देवळात गेलीय्.

नाना : ( विलक्षण पिसाळून ) राजा....चंद्री कुठं गेलीय्, बोल !

[ राजा, बाळ आणि लक्ष्मण–तिघेही घाबरून गेलेले. ]

लक्ष्मण : तुम्ही चला, साहेब, वरती. ती येईल !

नाना : ( हटून ) नाही ! नाही ! ती खरोखर कुठं गेलीय्, हे कळल्याशिवाय मी इथनं हलणार नाही.

[ याच वेळी चंद्राक्का बाहेरून येते, आणि घरात जाऊ लागते. ]

नाना : थांब ! ( ती थांबते. ) कुठं गेली होतीस ?

चंद्राक्का : ( बावरून ) देवळात. ( हातातलं फुलपात्र दाखवून ) हे बघा ना.

नाना : मला फसवतेस... रांडे ! ( तिच्या हातातलं फुलपात्र उडवतात. ) असल्या ढोंगाला मी फसणारेय् !....हलकट ! माझ्या डोळ्यांत धूळ फेकतेस, नाही का ?

[ बोलताबोलता तिला मारायला सुरुवात करतात. ती किंचाळते. खाली पडते. नाना अंगात आल्यासारखे तिला बुकलत राहतात. बुटाच्या लाथा, सापडेल तिथं, मारतात. कमरेचा चामडी पट्टा सोडून, त्यानंही मारू लागतात. ती विव्हळते, किंकाळ्या फोडते. पण मधे पडायचा कुणाला धीर होत नाही. ]

नाना : साली, हरामखोर !.. मला फसवते ! देवळात गेली, म्हणते, देवळात ! हरामजादे, शेण खायला गेली होतीस, की नाही ?....थांब, तुला आज जिवंत ठेवत नाही ! चामडी लोळवतो तुझी ! म्हंजे पुन्हा कोणाला दगा द्यायची नाहीस ! रांडे, तू उकिरड्यावर लोळतेस नि लोक माझी अब्रू काढतात ! त्यांना तरी समजू दे, की असल्या बेईमान बाईचा मी जीव घेतल्याशिवाय राहणार नाही....म्हंजे हसायचे थांबतील दात काढून ! छिनाल, रांड ! गरीबपणा दाखवतेस !

आणि माझ्यावर चढून बसतेस ! आज तुला ठारच मारून टाकतो, भडविच्चे !

[ मार देऊनच ते जसे काही थकतात. त्यांचा आवेश थोडा कमी होतो. तशी राजा त्यांच्याजवळ धावत जातो. ]

राजा : नाना....नाना....

[ त्यांच्या हातातला पट्टा गच्च धरून ठेवतो. लक्ष्मण त्यांना बाजूला करतो. ]

नाना : (तोंडातल्या तोंडात) डर्टी बिच् ! डर्टी बिच् ! हलकट, साली ! (लक्ष्मण त्यांना धरून वर नेऊ लागतो. जाताजाता) परमेश्वरा.... सोडव एकदाचा या सगळ्यांतून ! गॉड, ओ गॉड ! (ते दोघे जातात.)

[ बाळ चंद्राक्काकडे जातो, आणि तिला उठवू लागतो. पण ती स्वतःच कशीबशी उठते, आणि झोकांड्या खात जिन्याच्या दिशेनं जाते.

नानांची खोली प्रकाशात.
नशेनं आणि थकव्यानं विकल झालेले नाना इझीचेअरवर बसलेले. चंद्राक्का आत येते. जमिनीवर बसून नानांच्या बुटांचे बंद सोडू लागते. ]

प ड दा

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ गेल्या अंकातील घटनेच्या दुसऱ्या दिवशी. सकाळी दहा– साडेदहाचा सुमार. रविवार असल्यामुळे, राजा आणि बाळ कॅरम खेळत बसले आहेत. ]

बाळ : मजा येते नाही, असं कॅरम खेळत बसायला ? रोज रविवार पाहिजे, म्हंजे आपण रोज रोज असे कॅरम खेळू !

राजा : आणि आपण असे कॅरम मांडून पहाऱ्यावर बसलो, की चंद्राक्कासुद्धा कुठं जायची नाही !

बाळ : हो, ना !

राजा : मग, काल नानांनी तिला झोडपून काढलं, तसा प्रसंगही यायचा नाही बिचारीवर.

बाळ : ए....काळी घेतलीस ! काळ्या माझ्या आहेत ! लक्ष कुठाय् तुझं ?

राजा : चल....काळ्या माझ्या !

बाळ : फोडलं कोणी ? तू !

राजा : ते गेल्या डावाला. आत्ता तूच फोडलंस !

[ दोघेही वाद घालू लागतात. बाळ पुन्हापुन्हा सांगतो, की ' राजा, तुझं लक्ष नाहीये खेळण्यात. तुझ्या डोक्यात भलतेच विचार चाललेत. म्हणून हे असं होतं.' राजा ते कबूल करीत नाही. वाद रंगात आला असताना मथूआत्या दबकत दबकत येते. तिच्या हातात एक डबा.]

मथूआत्या : केवढ्यानं भांडता, रे ! नाना नाहीये वाटतं घरात ?

बाळ : मथूआत्या....

मथूआत्या : इश्श !...ओरडू नकोस. मी आहे घाईत. एवढं द्यायला आलंते.

बाळ : काय आहे ?

मथूआत्या : नारळीपाकाच्या वड्या आहेत. घ्या. ( त्यांना वड्या देते. ) काल, म्हणे, खूप गडबड झालीसं ऐकलं !

बाळ : कसली गडबड ?

मथूआत्या : ( स्वैंपाकघराच्या दिशेला निर्देश करून ) तिला तुडवलीन् नानानं, होय ना ?

बाळ : तुम्हांला काय माहीत ? वर्तमानपत्रात आलंय् वाटतं आजच्या ?

मथूआत्या : मेल्यांनो ! वर्तमानपत्रं कशाला हवीयत् ? नाशिक म्हंजे काय मुंबै आहे, का काय ? इथं घराला घर लागून ! मांजर पादलं, तरी सगळ्या नाशकाला घाण येणार !

राजा : मग, झालं तर ! विचारायचं काय आणखी त्यात ?

मथूआत्या : नाही कसं ? आजवर यानं तिची राणीसारखी तैनात ठेवली ! आणि आता हाणामारीवर आलं, म्हंजे, मी म्हणते, विपरीतच का नाही ? त्यातनं आम्ही जरा वेगळंच ऐकलं, हो !

राजा : वेगळंच म्हंजे ?

मथूआत्या : म्हंजे असं, की काल, म्हणे, क्लबात देखील नानानं धिंगामस्ती केली.

राजा : धिंगामस्ती ?

मथूआत्या : म्हंजे त्याचा काही दोष नाही त्यात ! दारू प्यायल्यावर नाही माणसाचा तोल राहत. आता दारू पिण्यापर्यंत आलं, हे वरीक दुर्दैव, हो ! ....ऐकलं न् आतडं तीळतीळ तुटलं.

राजा : नाना कधीच दारू पीत नाहीत, मथूआत्या. उगाच घेतली असेल चमचाभर, कोणा गोऱ्या मेंबराबरोबर, झालं !

मथूआत्या : नाही....समजा, ढोसली जास्त, तरी त्यात त्याची चूक नाही, हो ! हिच्या दुःखानं पोखरलाय् ना तो ? ते विसरायला पीत असेल बापडा ! काल, म्हणे, क्लबात बोलाचाली झाली, ती हिच्यावरूनच ! त्या फौजदाराचं नाव घेऊन कोणी काहीतरी बोललं वाटतं चावट-पणाचं ! तं शिवीगाळ केलीन् त्या माणसाला, न् घरी येऊन हिला बुकललीन् ! आता हे असंच चालायचं, राजा ! भांडणं, मारामाऱ्या न् शिव्यागाळी ! मी सांगते तुला, ती रांड घरात आहे, तोवर घराला घरपण नाही !

राजा : हळू....केवढ्यानं बोलतेस ?

मथूआत्या : मला इथं गप्प करशील, रे....पण बाहेर कोणाकोणाच्या तोंडावर हात ठेवणारेय्स ? अलीकडे तर, म्हणे, दवाखान्यातसुद्धा यायला पेशंट तयार नसतात ! बरोबर आहे ! लोकांना विश्वास नको वाटा-

यला ? त्यातनं आता याची ख्याती दारूडा म्हणून झाली, म्हंजे काय, बघायलाच नको ! टाळं ठोकावं लागेल दवाखान्याला !

बाळ : हे सगळं आम्हांला कशाला सांगताय् , मथूआत्या ? नानांना सांगा. आम्ही का....ही करू शकणार नाही. नाही, म्हंजे, एकदम झीरो भोपळा ! हं....हा घ्या तुमचा डबा ! चांगल्या झाल्या होत्या, हो, वड्या ! चल, राजा–डाव पहिल्यापास्नं सुरू करू या ! तुझी फोडी !

मथूआत्या : ( नाखुशीनं ) जाते, हो, मी....तुमचा खेळ नको मोडायला ! आता बाळांनो, कळत नाहीये तुम्हांला, सांगते त्याचं महत्त्व !....पुढं मोठे झाल्यावर आठवण काढाल ! म्हणाल, आत्यानं तेव्हाच सांगितलं होतं ! ( जाते. )

बाळ : तुझी तरी कमाल आहे !....ती काय वाट्टेल ते सांगते, न् तू ऐकत काय बसतोस ?

राजा : न ऐकून तरी काय ! ती बाहेर बोलत असणारच ! तिच्यासारखी हजार तोंडं बोलत असणार !

बाळ : लोक, शप्पथ, अगदी कंडम् असतात !

राजा : लोक कशानं कंडम् ? नानांचंच चुकतंय् ... मग लोक बोलणार नाहीत ? ( उठून जाऊ लागतो. )

बाळ : कुठं चाललास ?

राजा : नानांच्या खोलीत.

बाळ : अरे, पण गेम तर पुरी कर !

राजा : तूच खेळ एकटा. माझं नाही लक्ष लागत.

बाळ : ते दिसलंच मघा. पण आत्ताच कशाला जातोयस नानांकडे ? आधीच ते कालपास्नं चंद्राक्कावर संतापले आहेत.

राजा : म्हणूनच ! आत्ता बोललो, तरच त्याचा उपयोग होईल.

बाळ : पण, अरे, आज रविवार आहे !

राजा : रविवार असला, म्हणून ?

बाळ : नाही, म्हंजे रविवारी नानांनी इप्सम् सॉल्ट घेतलेलं असतं. पोट रिकामं. त्यामुळं आधीच चिडलेले असतात.

राजा : तू, बाळ्या, वाटेल त्या सबबी काढू नकोस ! टरक्या कुठला !

बाळ : बघ, बाबा, पण असल्या बाबतीत मुलानं बापाला सांगायचं, म्हंजे—

राजा : मला नाही अवघड वाटत. मी खूप विचार करून ठेवलाय्. अगदी पाठच करून ठेवलंय् , काय सांगायचं, ते.

बाळ : ( उत्साहानं ) म्हण...म्हण पाहू.

राजा : बघ हां.... (आठवून बोलत) नाना, आजवर तुम्ही सांगितलेला प्रत्येक शब्द आम्ही फुलासारखा झेलत आलो. तुम्ही दिलेला मार मरेमरेस्तंवर खाल्ला. तुम्ही आमचे वडील म्हणून अभिमानानं आमची मान उंचावली, पण आता... आता.... (आठवायला वेळ घेत)... कुठपर्यंत आलं होतं ?

बाळ : आमची मान धरली....आपलं, उंचावली, तिथपर्यंत.

राजा : अभिमानानं आमची मान उंचावली, पण आता मात्र चंद्राक्काच्या या वागण्यानं, सबंध घराला खाली मान घालण्याची पाळी आली आहे. (थांबून) कसं वाटतं ?

बाळ : बरं आहे. पण ते 'मान' 'मान' फार होतं. ते जरा कमी कर.

राजा : तुला कळायचं नाही. त्याला अनुप्रास म्हणतात. असं बोललं, की जरा भारदस्त वाटतं. नाहीतर अशा गंभीर प्रसंगात आपण नानांशी काय रोजच्यासारखं बोलायचं ? मी तर त्यांना सांगणारेय्....नाना, तुम्ही मला ठारदेखील मारू शकाल....पण, जगाची तोंडं कशी बंद करणार आहात तुम्ही ?

बाळ : बघ, बुवा.... मला अजून वाटतं...

राजा : पुरे. (त्याच्यावर हात उगारतो. तो चुकवतो.) नाट लावू नकोस. मी जातो वरती.

[राजा वर जातो. नानांची खोली उजळते. नाना कसलं तरी जाडजूड मेडिकल बुक वाचत बसलेले. तोंडात सिगार. राजा हलकेच दारात येऊन उभा.]

राजा : (अनिश्चित.) नाना....

नाना : (वर पाहून) काय, रे ?

राजा : आत येऊ ?

नाना : ये ना....असं काय विचारतोस, पाहुण्यासारखं ?

राजा : नाही.... तुम्ही कामात असलात, तर....

[बाळशी बोलतानाची, राजाच्या अंगातली हुशारी, आता कुठच्या कुठं गेलेली.]

नाना : आज झालंय् काय तुला ?

राजा : मला तुमच्याशी थोडं बोलायचंय्, नाना.

नाना : (आश्चर्यानं) तुला?... माझ्याशी बोलायचंय्? कमाल आहे! एरवी तर मी बोलायला आलो, की तू काहीतरी निमित्त काढून सटकतोस! (हसतात.)

राजा : नाही... हे जरा महत्त्वाचं....

नाना : फीसाठी पैसे हवेत? की आणखी ट्रिप, सिनेमा....

राजा : पैसे नकोयत, नाना.

नाना : मग?

[टरलेली वाक्यं म्हणायची वेळ आल्येय्. पण वेळेवर काही आठवेल, तर शपथ!]

नाना : बोल ना.... गप्प का उभा?

राजा : नाना.... (काळजीपूर्वक आठवून) आजवर आम्ही तुमचा प्रत्येक शब्द फुलासारखा झेलत आलो....

नाना : बरं, मग?....

राजा : (आठवत) तुम्ही आमचे वडील, म्हणून अभिमानानं आमची मान खाली.... आपलं उंचावते. तुम्ही दिलेला मरमरेस्तंवर मार...

नाना : अच्छा.... म्हणजे तू कालच्या प्रकाराविषयी बोलतोय्स? मी चंद्राक्काला मारलं, त्या.... आयॅम् सॉरी, राजा, मी तसं....

राजा : त्याविषयी नाही म्हणत.

नाना : मग?

राजा : नाना.... चंद्राक्काला जायला सांगा.

नाना : (आश्चर्यानं) काय म्हणालास?

राजा : मी म्हटलं.... चंद्राक्काला आपल्या घरातून जायला सांगा.

नाना : अरे, पण कशासाठी घालवायचं तिला? केलंय् काय तिनं?

राजा : ते तुम्हांला ठाऊकेय्, नाना. तुम्ही आत्तापर्यंत कबूल करीत नव्हता ....पण आता तुम्हांलाही ते पटलंय्. म्हणून तर तुम्ही तिला काल लाथाबुक्क्यांनी....

नाना : (ओरडून) राजा! तू काय बोलतोय्स, हे तुझं तुला तरी कळतंय् का?

राजा : हल्ली तुम्ही दवाखान्यातनं वाटेल तेव्हा परत येता! का? पेशंट्स् कमी झालेत, म्हणूनच ना?

नाना : (वर्मी लागून) पेशंट्स.... कमी.... झालेले नाहीत! (थांबून) आणि झाले, तरी त्याचा चंद्राक्काशी संबंधच काय?

राजा : चंद्राक्कासारख्या बाईला तुम्ही घरात ठेवल्यावर चांगले लोक कसे येतील दवाखान्यात?

नाना : राजा.... मुस्कटात खाशील, वाटेल ते बरळलास, तर!

राजा : तुम्ही, हवं तर.... मला ठारदेखील मारू शकाल, नाना! पण जगाची तोंडं कशी काय बंद करणार आहात तुम्ही?

नाना : कुणी शिकवलं? कुणी शिकवलं तुला हे बोलायला?

राजा : तुम्हांला हे सहन कसं होतं, नाना? उकिरड्यावर लोळून आलेल्या घाणेरड्या कुत्रीसारखी ती फौजदाराकडून जाऊन येते.... आणि तशीच आपल्या घरात वावरते.... तुम्हांला घाण नाही वाटत, नाना?

नाना : राजा!

[ विलक्षण त्वेषानं ते त्याच्याजवळ जाऊ लागतात. त्यांचे हात शिवशिवताहेत. ते त्याचा गळादेखील दाबतील, असं वाटतं. राजाच्या नजरेतही भीती.
पण नाना संताप आवरतात. थरथर कापत, तसेच, असहायपणे खुर्चीला धरून उभे राहतात. ]

नाना : तू, तू तिला उकिरड्यावरची कुत्री म्हणालास? राजा... तू लहान आहेस....आपण काय बोलतो, याचा अर्थ तुला समजत नाही, म्हणून.... चार लोक बोलतात, ते ऐकून तू तोंडाला येईल ते बोललास! पण पुन्हा असं बोलू नकोस!.... तिच्यासमोर तर कधीच बोलू नकोस! राजा, केवळ एका दोषासाठी माणसाला नावं ठेवण्याची सवय वाईट! अरे, माणूस म्हणजे त्यापेक्षा आणखी पुष्कळ असतं!

राजा : ती आपल्या घरातून गेली पाहिजे, नाना! ती इथं आहे, तोवर लोक आपल्या घराला वाईटच समजणार!

नाना : तू कुणाला घरातून घालवायला सांगतोयस, राजा? जिनं तुम्हांला मायेनं खाऊपिऊ घातलं, तुमची आजारपणं काढली, तुमचा मार स्वतःच्या अंगावर घेतला, तिला? तुमच्या आईला?

राजा : ती आमची आई नाही!

नाना : आई नाही? (संतापून) तू....तू हे मला सांगतोयस? मग मी

सुद्धा तुला सांगून ठेवतो! चंद्राक्का या घरातून जायची नाही! कधीच नाही!

राजा : ठीक आहे, नाना! मी चार दिवस वाट पाहीन. चार दिवसांत चंद्राक्का या घरातून जाणार नसेल, तर मीच हे घर सोडून जाईन.

नाना : तू? घर सोडून जाशील?

राजा : हो.... माझी मुदत फक्त चार दिवसांची आहे!

नाना : (सहनशक्तीचा स्फोट होऊन) चार दिवसांनी कशाला? आत्ताच जा ना.... चालता हो! अस्साच्या अस्सा! मला धमक्या देतोय्! आजवर कुणाचा शब्द ऐकून घेतला नाही या नानानं! तो तुझ्या-सारख्या नखटाएवढ्या पोराच्या धमक्यांना भीक घालणारेय्?

राजा : धमकी नाही ही...

नाना : चूप! एक अक्षर काढलंस तोंडातनं, तर बघ!... आधी चालायला लाग! अस्साच्या असा नीघ....आहेस, तस्सा! इथल्या एका वस्तूला हात लावलास, तर बघ.... नशीब समज, अंगातले कपडे काढून घेत नाहीये.

[राजा जाऊ लागतो.]

नाना : कुठं चाललास?

राजा : जायला सांगितलंत ना? मी चाललो घर सोडून!

नाना : जा.... मर! परत आलास, तर बघ!

[नानांच्या खोलीतला प्रकाश मंदावतो. राजा खाली उतरून येतो, तो त्याला जिन्याशी मुसमुसत उभा असलेला बाळ दिसतो.]

राजा : रडायला काय झालं?

बाळ : रागावले ना नाना?

राजा : घर सोडून जायला सांगितलं.

बाळ : बाप, रे!

राजा : चंद्राक्काला घालवायचं, ते सोडून मलाच....

बाळ : पण तू आता काय करणारेय्स?

राजा : मी चाललो घर सोडून.

बाळ : तरी मी तुला सांगत होतो...

राजा : भेदरू नकोस लगेच. कायमचा जात नाहीये मी.

बाळ : मग ?

राजा : मी नानांना चांगलं ओळखतो. घालवून दिलं, तरी तासाभरानं परत बोलावतील, की नाही, बघ !

बाळ : असं म्हणतोस ?

राजा : तुलाच पाठवतील शोधायला.

बाळ : खरंच ? मला....मग बे....स्ट ! तू कुठं असशील ?

राजा : मी....मी....( थोडा विचार करून ) मी घारपुरे घाटावर असेन. तू मात्र लगेच येऊ नकोस–सांगून ठेवल्यासारखा. जरा इकडे तिकडे वेळ काढ. चार ठिकाणी शोधलंसं वाटू दे....काय ?

बाळ : हो....

[ आतून चंद्राक्काची हाक : ‘ चला, रे, जेवायला ... ’ ]

राजा : जातो मी.

बाळ : जातोसच ?

राजा : गेलो.

[ चंद्राक्काची पुन्हा हाक. राजा बाहेर जातो. आतून लक्ष्मण येतो. ]

लक्ष्मण : जेवायला बोलावलंय्.

बाळ : ( रडवेला. ) मला नाही जेवायचं.

लक्ष्मण : ( आश्चर्यानं ) तुम्हांला ? आणि जेवायचं नाही ?

बाळ : नाही. राजा घर सोडून गेला....म्हणून !

[ चंद्राक्का बाहेर येते. ]

चंद्राक्का : चला, रे. थंड होतंय् जेवण. किती हाका मारायच्या ?

लक्ष्मण : बाळासाहेब काय सांगताहेत, बघा....

चंद्राक्का : काय ?

लक्ष्मण : राजाभाऊ घर सोडून गेले, म्हणे !

चंद्राक्का : घर सोडून गेला ? राजा ?

बाळ : विद्येशप्पथ. नानांनी त्याला घालवून दिलं.

चंद्राक्का : अरे, पण....असा कसा गेला ? मला न सांगता ? काय, बाई, अगोचर हा मुलगा ! झालं तरी काय, बाळ ?

बाळ : नानांनाच विचार, काय झालं, ते.

चंद्राक्का : विचारेनच. पान मांडलंय्, आणि हा आपला न सांगता...

[ ती जिना चढून वर जाते.
नानांची खोली उजळते.
नाना विलक्षण मनस्ताप झाल्याप्रमाणे डोळे मिटून खुर्चीत बसून राहिलेले.
चंद्राक्का आत येते. ]

चंद्राक्का : साहेब...

[ नाना डोळे उघडून, वळून तिच्याकडे पाहतात. ]

चंद्राक्का : राजाचं काय झालं ?

नाना : का ?

चंद्राक्का : बाळ सांगतो, तो घर सोडून गेला, म्हणून.

नाना : म्हणजे ? खरंच गेला ?

चंद्राक्का : तुम्ही त्याला जायला सांगितलंत ?

नाना : जाऊ दे. गेला, तर गेला. आपसूक परत येईल.

चंद्राक्का : कशासाठी गेला पण....?

नाना : त्याच्याशी तुला काय करायचंय् ? तू जा....माझी खिचडी घेऊन ये. पोटात पडलीय् आग ! जा....जा लौकर.

चंद्राक्का : (जायला निघते. मग वळून) खरंच का मला सांगणार नाही, राजाला का घालवलंत, ते ?

नाना : ऐकशील, तर चक्रावशील. मनाला लावून घेशील, म्हणून सांगत नव्हतो.

चंद्राक्का : नाही लावून घेणार मनाला.

नाना : आणि, अग, काही अर्थ नाही त्यात ! कुणाचं तरी ऐकतो, काहीतरी डोक्यात घेतो !

चंद्राक्का : सांगा तर खरं...

नाना : चिरंजीव म्हणतात, की चंद्राक्काला इथनं जायला सांगा. या घरात ती तरी राहील, नाहीतर मी तरी !

चंद्राक्का : मग ?

नाना : मी म्हटलं, चंद्राक्का कुठं जायची नाही. तुला जायचं असलं, तर ....तर तू मोकळा आहेस.

चंद्राक्का : असं कसं सांगितलंत ?

नाना : का ?

चंद्राक्का : साहेब, त्यांनी जाऊन कसं चालेल ? ते या घराचे मालक आहेत ! मी कोण आहे इथली ? मोलकरीण ! मोलकरणीसाठी मालकाला जायला सांगता ?

नाना : आम्ही कुणी तुला मोलकरीण मानत नाही, चंद्रा. त्यांना काय समजत नाही, तू त्यांचं सगळं आईसारखं केलंयस, हे ?

चंद्राक्का : केलं, तेव्हा ते लहान होते. त्यांना माझी गरज होती. आता ते मोठे झाले. तुमचीही गरज पूर्वीइतकी राहिली नाही. आता तुम्ही, जा, म्हटलंत, तर मी जायला हवं !

नाना : मी नाही तुला ‘ जा ’ म्हणणार !

चंद्राक्का : हा तुमच्या मनाचा मोठेपणा आहे, साहेब ! लोक वेडंवाकडं बोलतात, ते तुम्हांला सहन करता येतं. तुमच्यांत तेवढी ताकद आहे. पण त्या लहान मुलांनी कसं सोसायचं ?

नाना : तू रागावलीस, चंद्रा, माझ्यावर ? काल मी तुला वाटेल तसं बडवलं, म्हणून ?

चंद्राक्का : त्याचा राग नाही आला, साहेब....उलट, बरं वाटलं. आजपर्यंत तुम्ही आपलं मन दडपून ठेवत आलात ! काल पहिल्यांदाच ते मोकळं होऊन माझ्याशी बोललं. ते मारणं नव्हतं, साहेब, ते तुमचं माझ्याशी खरंखरं बोलणं होतं.

नाना : तरीही माझं चुकलंच, चंद्रा. मला समजायला हवं होतं....तूही माणूस आहेस. तुलाही मोह आहेत. गरजाही आहेत.

चंद्राक्का : नाही, साहेब. मी घसरले. आता अधिकाधिक घसरतच जाणार. मग मी इथं कशासाठी राहू ? माझ्या पापाचं ओझं या निर्मळ घरावर कशाला लादू ? मी जाते, साहेब.

नाना : जाते, म्हणतेस पण कुठं जाणारेयस ?

चंद्राक्का : कुठंही जायची माझी तयारी आहे. तुम्हीच माझी व्यवस्था लावून

द्या. द्याल ? पडेल ते काम करायची माझी तयारी आहे. पण म्हातारपणात अगदीच उघडी पडणार नाही, इतपत साधारणसं बरं घर बघून द्या. बघाल ?

[ नाना गप्प. ]

चंद्राक्का : आणि एक सांगू ? ज्या घरात मुलंबाळं असतील, असं घर बघा. मुलांशिवाय अगदी चैन पडायचं नाही मला. इतक्या वर्षांची सवय झालीय् ना ? (बोलता बोलता गप्प होते.)

नाना : चंद्रा....

चंद्राक्का : हो, आणखी एक सांगते. घर पाहाल, ते या गावात नको. बाहेर कुठंही चालेल. तिथं मला, म्हटलं तर, स्वच्छ राहता येईल. या गावात लांडगे आहेत, हो, एकेक....ते नाहीत मला सुखानं जगू देणार. ते वाटच पाहत असतील, मी कधी घराबाहेर पडते, याची. फौजदाराला कधी सोडते, याची. आयतीच त्यांच्या पंज्यात सापडले, तर मला ते शिल्लक नाही ठेवणार. चिंधड्या चिंधड्या करतील माझ्या. गावातल्या गावात तुम्हांला ते बघणंही कठीण जाईल. म्हणून म्हणते....शक्य तर बाहेरगावी करा माझी सोय.

नाना : बघू या. मला विचार करावा लागेल.

चंद्राक्का : जाते मी. तुम्ही बसा. मी इथंच पाठवून देते खिचडी.

[ नानांच्या खोलीतला प्रकाश मंदावतो.
चंद्राक्का माडीवरून खाली येताना दिसते.
खाली, बाळ आणि लक्ष्मण. ]

बाळ : काय म्हणाले नाना ?

चंद्राक्का : काही नाही. आपण राजाला शोधून परत आणायला हवं.

लक्ष्मण : पण शोधायचा कुठं ?

चंद्राक्का : बाळ....तुला माहीतेय् का, रे, राजा कुठं गेला असेल ?

बाळ : (चपापून) छे....मला कसं माहीत असणार ? मला थोडंच सांगून गेलाय् तो ?

चंद्राक्का : तसं नाही, रे...पण कुठं जाईल, याचा अंदाज तर असेलच तुला. वामन्याकडे बघ. मथूआत्याकडे बघ.

बाळ : हां...तसं येतो बघून.

चंद्राक्का : शहाणा आहे, माझा बाळ !

बाळ : जेवून जाऊ का ?

चंद्राक्का : फार भूक लागल्येय् का तुला ? थोडी कळ सोसवत असली, तर आधी त्याला बघून ये. नाहीतर तेवढ्यात कुठं तरी जायचा. सापडेपर्यंत काळजीच त्याची. जातोस ? चटकन् सापडला, तर दोघे मिळून जेवा, हं....? जा, बाळा ! लक्ष्मण, तू पण जा त्याच्या बरोबर....

[ नाना जिन्यावर येतात. ]

नाना : कुठं चाललात ? लक्ष्मण....बाळ....कुठं चाललाय् तुम्ही ? राजाला बोलवायला ? खबरदार कुणी त्याला बोलवायला गेलं, तर !....तंगडी मोडून ठेवीन एकेकाची !

चंद्राक्का : पण, साहेब....

नाना : पण नाही न् बीण नाही ! आजपासून तो या घराला मेला ! मोठी हुशारी करून गेलाय्....चांगला धडा शिकू दे त्याला ! जागचा हललास, तर बघ, बाळ्या ! राजाला शोधायला कोणी जाऊ दे तर खरं....त्या माणसाला परत या घरात पाऊल टाकता येणार नाही !

का ळो ख

## प्रवेश दुसरा

[ त्याच दिवशी, संध्याकाळी. नाना माडीवरून उतरून दारापर्यंत जातात. बाहेर लांबवर पाहतात.
नाना वळतात, तर पाठीमागे चंद्राक्का उभी. ]

नाना : दार वाजलंसं वाटलं, म्हणून आलो पाहायला.

चंद्राक्का : आत्ता एवढ्यातल्या एवढ्यात, हे चौथ्यांदा आलात दार बघायला.

नाना : काहीतरीच काय ? मी कशाला येईन दार बघायला ?

चंद्राक्का : अहो, तुम्हीच का? मीसुद्धा सत्रांदा बघून गेले. आता संध्याकाळ पडायला आली....अजून किती वेळ वाट पाहायला लावणारेय् हा पोरगा, कोण जाणे! काहीतरी डोक्यात घेऊन जिवाचं बरंवाईट करून घेतलं नसलंन्, म्हंजे मिळवली!

नाना : बरंवाईट? बरंवाईट कसं करील? (पण त्या कल्पनेनं किंचित हादरलेले.) त्याला स्वतःची काही अक्कल असेलच, की नाही? नाही ....मी तुला सांगतो...तसलं काहीएक तो करायचा नाही.... (थांबून) पण तुझ्या कुठनं हे डोक्यात आलं? पूर्वी कधी काही म्हणाला होता?

चंद्राक्का : नाही, हो....मी आपली सहज म्हणाले. एवढं घाबरून जायला काय झालं?

नाना : छ्याः! मी कशाला घाबरेन? आपला काय संबंध आता त्याच्याशी? तो गेला, म्हणजे गेला! आपण नाही त्याची काळजी करीत!

चंद्राक्का : नाही कशी काळजी? किती वेळ झाला! एव्हाना परत यायला हवी होती पोरं!

नाना : पोरं? म्हणजे? म्हणजे बाळ गेलाय् वाटतं त्याला शोधायला? तू पाठवलंस बाळला? अग, तुला काही लाज वाटते का? तुला घराबाहेर काढायला निघालाय् तो! आणि तू त्याला शोधायला माणसं पाठवतेस? यायचं असलं, तर आपल्या पायांनी परत येईल! त्याची मिजास चालू द्यायचं काही कारण नाही आपल्याला! समजलं?

चंद्राक्का : हो. तुम्ही चला बरं आधी आपल्या खोलीत! जरा स्वस्थ पडा. आज एका खिचडीशिवाय दुसरं काही नाहीये तुमच्या पोटात! डोकं दुखायला लागेल अशानं, चला पाहू वर!

[ नानांना वर घेऊन जाते.
क्षणभरानं राजा, बाळ आणि लक्ष्मण येतात.
लक्ष्मण वर जाऊ लागतो. ]

राजा : कुठं चाललास?

लक्ष्मण : सांगतो जाऊन सायबांना, राजाभाऊ आलेत, म्हणून.

राजा : नको सांगूस. तू आत जा, कामाला.

[ लक्ष्मण आत जातो. ]

बाळ : आता आणखी काय राह्यलंय् तुझं ?

राजा : तुझी चांगली खरडपट्टी काढायची राह्यलीय्. मघा लक्ष्मण होता बरोबर, म्हणून बोललो नाही !

बाळ : आँ ? मी काय केलं ?

राजा : केलं काय ? साल्या, मला इतका वेळ वाट बघायला लावायची ? मी गेलो, तेव्हा दुपारसुद्धा झाली नव्हती...आणि तू उगवलास पार संध्याकाळी !

बाळ : मग कोणी पाठवायला तर हवं ? का मीच येऊ आपणहून ?

राजा : म्हंजे ? नानांनी पाठवलं नाही ?

बाळ : तंगडी मोडून ठेवीन, गेलात, तर, म्हणून सांगितलं होतं. आम्हांल वाटलं, उगाच बोलत असतील, थोड्या वेळानं मन पालटेल. म्हणून सगळी वाट पाहत बसलो. पण ढिम्म नाही. तुला वाटतं, तितके काही नाना भोट नाहीत. तासचे तास येरझारा घालीत बसले, पण तुझं नाव काढीनात. आम्ही जेवून घेतलं....एक झोप काढली... तरी यांच्या येरझारा चालूच ! पण तुला बोलवायचं काही नाव नाही !

राजा : म....ग ?

बाळ : शेवटी चंद्राक्कालाच राहवेना. म्हणाली, काय मारझोड करायची, ती करू देत. पण तू आधी राजाला घेऊन ये. ती असं म्हणाली, तेव्हा निघता आलं.

राजा : पण, गध्ध्या, आता वाजले किती ?

बाळ : वा, रे, वा, तूच तर म्हणाला होतास, लगेच येऊ नकोस, म्हणून ! तासभर तरी इकडे तिकडे शोधल्यासारखं दाखव....

राजा : म्हणून तुम्ही शोधत बसलात ?

बाळ : तर....! काय काय शोधलंय् ! एक जागा शिल्लक ठेवली नाही. पांजरपोळातसुद्धा जाऊन आलो !

राजा : पांरजपोळात ? मला शोधायला !

बाळ : मी नकोच म्हणत होतो ! पण लक्ष्मणचा आग्रह ! म्हणाला, हट्टानं निघालेलं माणूस कुठं पण जातं ! पोलिसांतच वर्दी देऊ या, म्हणत होता. म्हटलं, नको; नंतर निस्तरायचं कोणी ?

राजा : म्हंजे ? खरंच तुम्ही शोधत होता ?

बाळ : नाही! गंगेवर जाऊन गोट्या खेळत होतो!

राजा : अरे, पण माझी कढी पातळ झाली ना तिकडं! म्हटलं, हा येतो, का नाही? घाटावर चिटपाखरू नव्हतं. एकदा वाटलं, पोहावं मस्तपैकी. पण आज लक्षच लागेना, पोहण्याबिहण्यात. मग पोटात कावळे कोकलायला लागले, तसं बद्रीप्रसादकडून गरम जिलेबी न् पापडी घेऊन खाल्ली!

बाळ : एकट्या एकट्यानं खाल्लीस ना जिलेबी?

राजा : आज जिलेबीसुद्धा गोड लागेना, रे! वाटायला लागलं, नाना परत बोलावणारच नाहीत! वाटलं, उगाच गोष्टी या थराला नेल्या.

बाळ : मी सांगत होतो तुला!

राजा : अरे, पण मी काय हे स्वत:साठी केलं का? घराची अब्रू जाते, ती सावरावी, म्हणूनच ना माझी धडपड चाललीय्?

बाळ : आता काय सांगशील नानांना?

राजा : काही सांगणार नाही. तूच सांग चंद्राक्काला, मी आलोय्, म्हणून! म्हणावं, तो येतच नव्हता, मोठ्या मुश्किलीनं आणला!

[ चंद्राक्का वरून खाली येत असलेली. ]

चंद्राक्का : आलास, राजा?.... तरी मला वाटलंच, तुझा आवाज ऐकल्यासारखं.

[ तशीच धावत वर जाते. नानांची खोली उजळते. ]

चंद्राक्का : साहेब... राजा आला! राजा परत आला!

नाना : कुठाय्?

चंद्राक्का : खाली आहे!

नाना : खाली काय करतोय्? वर पाठवून दे त्याला. (फडताळातून छडी काढतात.)

चंद्राक्का : माझी शप्पथ आहे तुम्हांला. लेकरू हाती लागलं, तेच खूप आहे! आता त्याला आणखी बोलू नका!

नाना : बरं बरं....तुम्ही नका अक्कल शिकवू! त्याला पाठवून द्या वर! डॅम् फूल्स्!

चंद्राक्का : मारायचं नाही हं त्याला. काय बोलायचं, ते तोंडानं बोला. अंगाला बोट लावायचं नाही त्याच्या—सांगून ठेवते.

[ ती जाते.
नाना जागचे उठून येरझारा घालू लागतात.
क्षणभरानं राजा दारात येऊन उभा राहतो.
नाना त्याच्याकडे पाहत राहतात.
मग हातातली छडी खाली टाकून त्याला आवेगानं मिठी मारतात.]

नाना : राजा– राजा– राजा– राजा– पुन्हा कधी असा घर सोडून जाऊ नकोस....नाही ना जाणार ?

[ क्षणभर दोघे तसेच उभे. मग राजा आपली सुटका करून घेतो. ]

राजा : ( सावकाश ) चंद्राक्कानं बोलावलं, म्हणून मी परत आलो, नाना. पण माझा निश्चय कायम आहे....ती इथं राहणार असली, तर मला नाही राहता येणार !

[ नाना थकल्यासारखे इझीचेअरमध्ये अंग टाकतात. ]

नाना : ( थकल्या स्वरात ) एकदम असा हट्ट कसा धरतोस, राजा ? तिचा काही विचार केलास का ?

राजा : तिचा काय विचार करायचा ? तिच्यामुळंच तर घरावर हा प्रसंग ओढवलाय् !

नाना : ती तयार आहे, राजा, इथनं जायला. पण तिची काहीतरी व्यवस्था नको करायला ? का आपली एकदम तिला वाऱ्यावर सोडायच्येय् ?

राजा : व्यवस्था करा नं तिची. तिला पैसे द्या, हवे तर. कितीही द्या. पण तिला या घरात ठेवू नका. ( थांबून ) किती दिवस लागतील व्यवस्था करायला ?

नाना : सात–आठ तरी लागतील.

राजा : पुढल्या रविवारपर्यंत थांबायला मी तयार आहे.

नाना : ( थकल्यासारखे ) राजा... कालपर्यंत एवढास्सा होतास. आज माझ्याशी बरोबरीनं बोलतोय्स....

[ खुर्चीच्या पाठीवर डोकं टेकतात, आणि हात डोक्यांखाली घेतात. डोळे मिटून घेतात. ]

राजा : नाना, आज मी बाळला सापडलो. पण पुढल्या रविवारी गेलो, तर सापडेनच, असं नाही. एखादवेळी गाडीत बसून नाशका बाहेरच गेलो, तर...

नाना : (सावकाश) आततायीपणा करू नकोस, राजा. ती जाईल.

[एकाएकी त्यांच्या बंद पापण्यांखालून आसवांच्या धारा गालांवर ओघळू लागतात. ते ती आसवं न पुसता तशीच वाहू देतात. राजा किंचित पुढं होतो, जसा काही ती आसवं पुसण्यासाठी. पण मग संकोचून आपणहूनच मागं होतो. क्षणभर त्यांच्याकडे पाहत राहतो. नाना डोळे उघडून त्याच्याकडे पाहतात.]

नाना : जा–खाऊन घे काहीतरी. उपाशीच असशील ना, सकाळपासून? जा...

[राजा खोलीबाहेर जातो. खोली अंधारात. राजा संथपणे पायऱ्या उतरतो.
बाहेरून वामन्याच्या जोरजोरात हाका : 'राजा....ए राजा' हाकांपाठोपाठ वामन्या ओरडतच येतो.]

वामन्या : (अतिशय उत्साहात) हात मिलाव, भाई, हात मिलाव!

राजा : झालं काय पण?

वामन्या : पयले हात मिलाव. मग सांगता हूं!

राजा : (त्याचे हात धरून हलवीत) आता सांग.

वामन्या : पटवली!

राजा : म्हंजे?

वामन्या : म्हंजे पटवली! तुला सांगितलंतं ना, एक ना एक दिन आपण पण पोरगी मिळवणार.... आणि तिला घुमवणार, म्हणून?

राजा : मग?

वामन्या : मग काय? आज संधी साधून उचलली न् काय? चार–दोन वेळा बोलणंचालणं झालं होतं– पण तेवढ्यावर, सिनेमाला चल, म्हटल्या-बरोबर पटकन् आली! घरी क्लासचं खोटं कारण सांगितलंन्!

राजा : मग? पाह्यलात सिनेमा?

वामन्या : म्हंजे थेटरात जाऊन बसलो, रे! पण सिनेमा कोण पाहतंय्?

आपण हात फिरवून घेतला !

राजा : खरं सांगतोस ?

वामन्या : अरे, हे तर काहीच नाही. सिनेमानंतर मड्डुम डोहावर नेली. तिथ कुण्णी नसतं दुपारी ! जाम मजा आली !

राजा : माझा नाही विश्वास बसत तुझ्या बंडलबाजीवर !

वामन्या : तिलाच विचार, हवं तर. तू कसं विचारणार म्हणा ? तुझी–तिची ओळखदेखील नाही ! तू आपला लांबूनच मर तिच्यावर.

राजा : कुणावर ?

वामन्या : ती, रे ! तुमच्या मथूआत्याच्या घरासमोर राहते, ती ! त्या आपल्यांची....

राजा : ( धक्का बसून ) गुलबकावली ?

वामन्या : अंहं....तिचं नाव पुष्पा.

राजा : पुष्पा ?

वामन्या : तुला नावसुद्धा नव्हतं ना माहीत ? मला वाटलंच. बाकी तिच्याकडे पाहून खरंसुद्धा वाटत नाही, की....

[ वामन्या बोलत राहतो. पण राजाला जसे त्याचे शब्द ऐकूच येईनासे होतात. तो आपल्याच विचारात बुडून गेलेला. ]

राजा : पुष्पा ! मी मात्र तिला आजवर गुलबकावली समजलो ! पण नाही.... तीही चारचौघींसारखीच एक पुष्पा निघाली ! किती भयंकर ! गुलबकावली अशी ! चंद्रिका तशी ! कोण्णी कोण्णीसुद्धा स्वच्छ, निर्मळ नसतं का ?

[ दोन्ही हातांनी चेहरा झाकून घेतो. ]

का ळो ख

## प्रवेश तिसरा

[ आणखी आठवडाभरानं.
संध्याकाळ होण्याचा सुमार.
नानांची खोली प्रकाशित. नाना इझीचेअरवर बसलेले.
चंद्राक्का त्यांच्यासाठी चहा घेऊन येते. ]

चंद्राक्का : चहा आणलाय् .

नाना : अं ? हो....( तिच्या हातातून चहाचा कप घेतात. ) आता कशाला करीत बसलीस चहा नि बिहा ? तुला तयारी नाही का करायची ?

चंद्राक्का : वेळ आहे अजून निघायला. आणि तयारी तयारी ती काय मोठी करायचीय् ?

नाना : तेही खरंच. कसं आहे बघ, चंद्रा ! घर घर म्हणून इतकं सगळं जमा केलंस आणि आता सगळं एकदम सोडून चाललीस.

चंद्राक्का : मरेपर्यंत इथं राहते, तरी तेच. शेवटी एकदम सगळं सोडूनच ना गेले असते ?

नाना : तुझा बँकेतला अकाउंट ट्रान्सफर करायला सांगितलाय् मी मुंबईला. कालच अकाउंटला थोडे पैसे भरून आलो. तशी अगदीच कफल्लक नाही व्हायचीस तू . हो...आणि कधी नड पडली, तर चार ओळी लिही. लगेच पैसे पाठवीन. उद्या मी नसलो न् राजा-बाळकडे मागितलेस, तरी ते देतील. अगदीच विसरायचे नाहीत तुला.

चंद्राक्का : एकट्या जिवाला असं काय लागणारेय् मोठंसं ? पण पडलीच नड, तर कळवीन. त्यातनं तुम्ही व्यवस्था केलीय् , तीदेखील चांगल्या घरात.

नाना : मित्रच आहे माझा. माणूस सज्जन आहे. चांगलं मुलाबाळांचं घर आहे, तुला काही त्रास नाही व्हायचा तिथं.

चंद्राक्का : हो. ( पटकन् पदरानं डोळे टिपते. )

नाना : चंद्रा....इकडे बघ, चंद्रा— चंद्रा, मला आता ठाऊकेय्, की मी किती नाही म्हटलं, तरी तुला त्रास व्हायचा, तो होईलच— या

घराच्या आठवणीनं. पण ते सुरुवातीला. मग हळूहळू ... तू जमवून घेशील. कठीण जाईल....ते आम्हांलाच. (थांबून) या बोलण्याचाही काही उपयोग नाहीये, म्हणा....पण सहन करायचं. सहन करायचं.... समोर आलंय्, ते. ( थांबून, एकदम ) नाहीतर....नाहीतर रद्दच करतेस का जाणं ?

चंद्राक्का : आता ? गाडीचं तिकीटसुद्धा काढलं !

नाना : तिकिटाचं काय मोठंसं ? गेलं, तर गेलं वाया. बघ....अजून विचार कर.

चंद्राक्का : नको, साहेब....आता मोहात पाडू नका. जे ठरलंय्, तेच सगळ्यांच्या हिताचं आहे. आज जातेय्, ती मानानं जातेय्. पुढंमागं, दुर्दैवानं तुमच्या पाठीमागं राहिले, तर घरात मुलांच्या बायका येतील, त्या लाथा मारून घालवतील. मग त्या वयात मी कुठं जाऊ ?

नाना : खरं आहे. ( कप पुढं करून ) चहा घे.

[ ती हसते आणि त्यांच्या कपातला राहिलेला चहा पिऊन टाकते.]

चंद्राक्का : जाते मी. काही लागलं, तर हाक मारा. ( जाते. )

[ जिन्यातून उतरून येते. खाली बाळ आणि राजा बसलेले. ]

चंद्राक्का : काय, रे, नुसतेच काय बसून राहिलात ? अभ्यास नाही वाटतं दिलेला ?

राजा : नाही.

चंद्राक्का : अरे, मग खेळायला तरी जा.

राजा : पावसात कुठं जाणार ?

चंद्राक्का : मग घरातल्या घरात कॅरम-पत्ते असलं काहीतरी खेळा. पण नुसतेच नका बसून राहू.

बाळ : चंद्राक्का, तुला काही मदत हवी असली आवराआवरीला, तर सांग ना आम्हांला.

चंद्राक्का : ( हसून ) नको. माझं आवरलं. आणि, हो, बरी आठवण झाली. बाळ, तुझी ती पाटलोण तोकडी होते, म्हणत होतास ना, ती जांभळी....तिची कडा आज उसवून ठेवल्येय्. आता वापरायला काढ. ( हसून ) किती वापरतोय्स, ते बघते पण ! लंबूटांग्या होत

चाललायस. सहा महिन्यांत पुन्हा तोकडी होणारेय् ती ! मग काही उसवायला माया नाहीये, हो.... ( जाते. )

बाळ : राजा ! मला नाही, रे, सहन होत, चंद्राक्का जाणार, ते....

राजा : मग रडा ! आणि घ्या ठेवून तिला ! म्हंजे मी एवढं सगळं जमवून आणलंय् , त्याच्यावर पाणी ! नानांना काय, आयतंच निमित्त मिळेल तिला थांबवून घ्यायला !

बाळ : एवढं आहे, तर मघा का नजर चुकवत होतास तिची ? सांगून टाक, तुला काही वाटत नाहीये, म्हणून !

राजा : मला...अरे, तसं ती जाताना थोडं वाईट वाटणारच ! पण एकदा आपण ठरवलं ना, तिनं गेलंच पाहिजे, म्हणून ? मग आता मागं फिरून कसं चालेल ?

बाळ : आपण ठरवलं, म्हंजे कुणी ठरवलं ? एकट्या तूच ! नानांना तर मुळीच पटत नव्हतं !

राजा : ते सुरुवातीला....पण नंतर ऐकलंच, की नाही, त्यांनी ? बंड आहे, बाबा, हे, बंड ! बंड म्हटलं, की तिथं माघार घ्यायची नसते ! प्राण गेला, तरी ! इतिहासात काय शिकवतात ?

[ मथूआत्या येते. ]

मथूआत्या : कळल्याबरोबर लगेच निघून आले. आत्ताच्याच गाडीनं जायचीय् , म्हणे, चंद्री....?

बाळ : हो.

मथूआत्या : बरं झालं, हो, घर पुरतं पोखरायच्या आत घूस बाहेर पडली ! रीती-पुरतं दाखवा, हवं तर, वाईट वाटल्यासारखं, पण मी म्हणते, जातेय् , ते चांगलंच ! उलट, स्वच्छ होतंय् घर ! चांगली गृहशांत करून घ्या, ती गेल्यानंतर ! असली अवदसा कायमची गेली, तरी घर पहिल्या-सारखं होण्यासाठी शांत हवीच, हो, करायला ! तुमच्या बायका येणार, त्यांना लाभायला हवं ना घर ?

बाळ : ते पुढचं पुढं ! आता तरी, ती गेल्यानंतर घराचं काय होणार, याचीच काळजी वाटते !

मथूआत्या : काळजी कसली ? अजिबात काळजी करू नका. उद्यापास्नं बाई देते. घरचं सगळं काम करील. ब्राह्मणाची आहे. चांगली उतारवयाची आहे. हो...म्हंजे हिच्यासारखे नटरंग करायला नकोत न् लोकांनी

घरावर शेणगोटे मारायला नकोत !

[ लक्ष्मण एक पत्र्याची छोटी ट्रंक घेऊन बाहेर येतो. त्याच्यामागून चंद्राक्का. एक पिशवी घेऊन, प्रवासाच्या तयारीत. लक्ष्मण आल्याआल्या ट्रंक खाली ठेवून वर जातो. ]

चंद्राक्का : निघते हळूहळू. नाहीतर उशीर व्हायचा. मथूआत्या, तुम्ही पण आलात ? बरं झालं. जायच्या आधी भेट झाली !

मथूआत्या : कुठं मुंबैला जायचीय्‌स वाटतं ? तिथं खूप वाव, हो, तुझ्यासारख्या बायकांना ! आमचं नाशिक आपलं लहान पडतं !

चंद्राक्का : नानासाहेबांनी सोय केलीय्‌ !

मथूआत्या : त्याची मेहरबानी तर आहेच, हो, पहिल्यापास्नं तुझ्यावर !

[ लक्ष्मण खाली येतो. त्याच्यामागोमाग नाना. अंगात सदरा आणि डोक्यावर टोपी चढवलेले. ]

लक्ष्मण : मी आलोच टांगा घेऊन.

[ बाहेर जातो. ]

नाना : चंद्रा....निघालीस ?

मथूआत्या : कमाल आहे, हो, नाना, तुझी ! घरातली कामाची बाई ती....आणि अगदी सासरी पाठवणी केल्यासारखं काय चाललंय्‌ ?

नाना : मथे, तू जरा थोडा वेळ तोंड बंद ठेवशील का ? आणि नेमक्या वेळी बरी आलीस आमंत्रण धाडल्यासारखी ?

मथूआत्या : न येऊन कसं चालेल ? मला घराबाहेर काढली होतीस, ती वेळ लक्षात आहे माझ्या. तरातरा वर जाऊन बसला होतास, आपल्या खोलीत. आता निरोप द्यायला आलाय्‌स टोपी घालून....गड्याला धाडलंस टांगा आणायला !...पण त्या वेळेस मी या बाळएवढ्या शिरीला घेऊन उन्हाची एकटी बाहेर पडले, अनवाणी ! ( पदर डोळ्यांना लावते. )

नाना : राईचा पर्वत करायची सवयच तुला ! पण निदान खोटं तरी बोलू नकोस ! मी तुला घालवली नाही ! तू आपणहून गेलीस तरातरा !

मथूआत्या : तशीच आलेय् बरं, आत्तादेखील ! आपणहून ! घराच्या काळजीनं ! तुम्ही सगळे भोळे सांब ! घरात आत्तापावतर हिचंच राज्य ! कोणाला कळणारेय्, ही जाताना काय नेते, न् काय नाही ? मग गेल्यानंतर रडत बसाल, त्याचा काय उपयोग ? म्हणून सावध करायला आले या पोरांना ! बाळ... उघडून बघ तिची पिशवी न् ट्रंक ! (बाळ तसाच उभा.) बघणारेय्स, का मी बघू ?

नाना : तू चालवलंय्स काय, मथे ? ती काय चोरबीर का आहे ?

मथूआत्या : तू आजवर डोळे मिटून तिच्यावर घर सोपवलंस ! कोणाला माहीत, तिनं किती लुटलं असेल ! (चंद्राक्काला) उघड ती ट्रंक. उघड आधी.

चंद्राक्का : खरंच, त्यात माझ्या नेसत्या लुगड्याशिवाय दुसरं काहीसुद्धा नाही, हो....

मथूआत्या : मग उघडायला का काचकूच ? आण इकडे चाव्या–मीच उघडते. आण म्हणते ना चाव्या.

चंद्राक्का : मी नाही द्यायची.

मथूआत्या : पाहिलंस ? पाहिलंस ? म्हटलं नव्हतं, लपवाछपवी करतेय्, म्हणून !

नाना : मथे, तिची ट्रंक उघडण्याचा आपल्याला काहीएक अधिकार नाहीये.

मथूआत्या : देणारेय्स, की नाही, चाव्या ?

चंद्राक्का : नाही म्हटलं ना ?

मथूआत्या : देतेस, की शेजारपाजारच्यांना बोलावू ?

चंद्राक्का : घ्या. नाहीतर तमाशा करायला तुम्ही मागंपुढं नाही पाहणार !

[चाव्या देते.]

मथूआत्या : आता कशी ? थांब तू....

[मथूआत्या ट्रंक उघडून उसकापासक करते, पण काही सापडत नाही.]

मथूआत्या : आता वाचलीस, काही नव्हतं, म्हणून ! नाहीतर सरळ पोलिसांत देणार होते, एक सुतळीचा तोडा मिळाला असता, तरी ! आणि काय ग, काही नव्हतं लपवण्यासारखं, तर टंगळमंगळ कशाला चालवली होतीस चाव्या द्यायला ?

चंद्राक्का : हा फोटो नेत होते लपवून. राजा–बाळचा, मुंजीतला. मागितला

असता, तर राजानं दिला नसता. परवा किती रागावला, नुसता हात लावला, म्हणून ! (राजाला फोटो परत देत) घे, राजा, परत.

राजा : (हलकेच) नको. ठेव तुझ्याकडेच.

[ लक्ष्मण येतो. ]

लक्ष्मण : टांगा आलाय् बाहेर.

चंद्राक्का : येते. (नानांच्या पाया पडते.) तब्येतीला सांभाळा. मसाल्याचं जास्त खाऊ नका. सोसत नाही हल्ली तुम्हांला. आणि पिणं बेतात. माझी शपथ आहे ! (मथूआत्याच्या पाया पडते.) येते हं, मथूआत्या.

[ मथूआत्या फुणफुणत निघून जाते. ]

लक्ष्मण : लौकर, चंद्राक्का.

चंद्राक्का : (राजा–बाळकडे जाऊन त्यांना जवळ घेते.) येते, बाळांनो...जपून राहा. मोठे व्हा. मस्ती करू नका. भांडू नका एकमेकांशी.

राजा : चंद्राक्का....माझ्यावर रागावलीस ?

चंद्राक्का : नाही, बेटा....मला तुझ्यावर रागावता येईल तरी का ? नीट अभ्यास कर. चांगल्या मार्कांनी पास हो. आणि निकाल लागल्याबरोबर आधी मला तार कर, बरंऽ, मी वाट पाहीन. आणि तुझ्या त्या बामन्याला पण सांग–म्हणावं, उनाडक्या थोड्या कमी करून अभ्यास कर... येते मी.

[ बोलत बोलत ती बाहेर जाते. लक्ष्मण तिच्याबरोबर जातो. त्यांच्यामागून राजा नि बाळ. नाना दारात उभे राहतात. क्षणभरानं वर निघून जातात. मग राजा आणि बाळ आत येतात. ]

बाळ : राजा....(एकदम राजाला मिठी मारून रडू लागतो.)

राजा : अंहं. रडायचं नाही. बिलकुल रडायचं नाही. (बाळ रडायचा थांबत नाही. तशी—) प्रधानजी....

बाळ : (रडतरडत) जी, सरकार...

राजा : आमची आज्ञा आहे....रडणं एकदम थांबवा !

[ बाळ मुसमुसत रडायचा थांबतो. ]

राजा : अरे, रडायचं कशाला ? जे करायचं, ते आपण करून दाखवलंय्. आपण जिंकलोय्, बाळ....आपण जिंकलोय्. तुला आनंद नाही होत ? आता आपल्या नानांना कोणी हिणवणार नाही....आता त्या बाळकूसारखी माणसं इथं येऊन उभी राहणार नाहीत. आता आपल्याला कसली काळजी नाही, बाळ....( बोलता बोलता गप्प होतो.)

[ लक्ष्मण बाहेरून येऊन घरात जातो.
काही क्षण राजा आणि बाळ–दोघेही गप्पच बसून राहतात.
बाहेर सावकाश अंधारू लागतं. ]

राजा : (बाळला) किती वेळ असा गप्प बसून राहणारेयस ? जा.... खेळायला जा. गंगेवर जा नाहीतर.

बाळ : तू येतोस ?

राजा : मी नाही येत. तू जा एकटाच.

बाळ : मी पण नाही जात. मला नाही पोहायचं. काहीच करावंसं वाटत नाही मला.

[ पुन्हा दोघेही गप्प बसून राहतात. मग....]

बाळ : मला भूक लागलीय्, राजा.

राजा : भूक लागली ? मग खा काहीतरी.

बाळ : काय खाऊ ?

राजा : ( किंचित चिडून ) मी काय सांगू ? डब्यात बघ.

बाळ : चंद्राक्का असती, तर तिनं असं म्हटलं नसतं. आपणहून आणून दिलं असतं.

राजा : ( आणखी चिडून ) आता चंद्राक्का घरात नाहीये, समजलं ? आणि प्रत्येक ठिकाणी चंद्राक्का कशाला हवीय् ? तू काय लहान आहेस आता, खायचं काढून घ्यायला ? गूळपापडी खा जा सकाळची....

बाळ : मी नाही खाणार गूळपापडी. मुळीच नाही खाणार. मला आवडते, म्हणून तिनं मुद्दाम आज केली .... माझ्यानं नाही आता ती

खाववणार....(रडवेला.)

राजा : ब....घ! रडलास, तर मार खाशील! एक टिपूस तर येऊ दे तुझ्या डोळ्यांत, नाही वडवला तुला, तर बघ! एवढं समजत नाही तुला? अरे, आपण रडलो, तर नानांना अधिकच वाईट नाही का वाटणार?

बाळ : नानांना?

राजा : हो....आधीच या सगळ्या प्रकरणात ते दुखावलेत. त्यांनी चंद्राक्काला मनाविरुद्ध घालवलं. आपल्यासाठी. आता आपण त्यांच्याशी अगदी प्रेमानं, गोडीनं वागायला हवं. त्यांचं मन ताळ्यावर येईपर्यंत त्यांना सांभाळून घ्यायला हवं. (एकदम लक्षात येऊन) किती अंधारून आलंय्....(स्विच ऑन करतो. पण दिवा लागत नाही.) अरे, वीज गेली वाटतं...

बाळ : (सवयीनं हाक मारीत) चंद्राक्का....अग, कंदील– (मग चूक लक्षात येते. राजा त्याच्याकडे रोखून पाहत राहिलेला.) अरे, मी चुकून....रोजच्या सवयीनं....

राजा : सवय बदलायला हवी आता, समजलास! गाढव कुठला! बरं झाले, चंद्राक्का गेली, तेच! ज्या त्या गोष्टीत चंद्राक्कावर अवलंबून राहायची वाईट सवय लागली होती आपल्याला! (आरडाओरडा करीत) लक्ष्मण....लक्ष्मण....लक्ष्मण, कंदील आण. वीज गेलीय्– घरात अंधार कशाला? काहीतरी बरंवाईट झाल्यासारखा? काही नाही! झालंय्, ते चांगलंच झालंय्!

[ लक्ष्मण येतो—हातात दोन पेटते कंदील. ]

राजा : (एकदम घराची सूत्रं हातात घेतल्याप्रमाणे) बघत काय राहिलास? तिकडं लाव खुंटीवर. आणि ध्यानात ठेव, यापुढं चंद्राक्का नसली, तरी घर पूर्वीसारखंच राह्यलं पाहिजे! काही लागलं सवरलं, तर मला विचार! अरे, आपण पुरुषमाणसंच चालवून दाखवू घर! त्यात आहे काय न् नाही काय!

लक्ष्मण : होय, राजाभाऊ. (वर जाऊ लागतो.)

राजा : कुठं निघालास?

लक्ष्मण : वर हा कंदील लावतो....

राजा : ठेव तो इथंच....मी लावीन मग....तू आधी याला खायला दे.... भूक लागलीय् त्याला.

लक्ष्मण : आता जेवायलाच वाढतो. सगळं आहे सकाळचं. गरम करत ठेवलंय्.

राजा : बरं. थोडं थालिपीठ कर. बाळपुरतं. कांदा खूप घाल. त्याला आवडतं. ( बाळला ) मग जेव आणि थोडा वेळ अभ्यास कर. नुसतं होमवर्क करून भागायचं नाही. आता परीक्षा जवळ आलीय् ना ! आणि गणितावर जरा जोर दे. त्यातच मार्क जातात तुझे. ( लक्ष्मणला ) तू पानं घे. मी नानांना सांगतो.

लक्ष्मण : सांगा.

बाळ : ( लक्ष्मणला ) चल....मी तुला मदत करतो, पानं घ्यायला.

[ त्याच्याबरोबर घरात जातो. राजा माडीच्या पायऱ्या चढू लागतो. नानांची खोली अतिशय मंद प्रकाशात. नाना इझीचेअरवर बसलेले. त्यांचा डोळा लागला असावा, असं वाटतं.
राजा खोलीच्या दारात येतो. ]

राजा : नाना....( नानांचं उत्तर नाही. ) नाना....काळोखात काय बसलात ! ( अत्यंत प्रेमळपणे ) नाना....जेवायला उठता ना ! ( थांबून ) उठा ....सगळं तयार आहे....गरम आहे, तोवर जेवून घ्या....( नाना डोळे उघडतात. त्यांचे डोळे प्रकाशानं दिपल्यासारखे होतात. ते काही बोलत नाहीत. फक्त ओठाचा उजवा कोपरा पसरून हसल्यासारखं करतात. ) चला....येता ना खाली !

[ राजा त्यांना उठवण्याचा प्रयत्न करतो. पण ते जागच्या जागीच. तो त्यांचा डावा हात उचलतो. तो लुळा होऊन खाली पडतो. ]

राजा : ( घाबरून ) नाना....असं काय करता, नाना !

[ नाना काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांचा आवाज घुसमटल्यासारखा येतो. शब्द फुटत नाहीत. राजा त्यांना फुलपात्रातून पाणी पाजण्याचा प्रयत्न करतो. पाणी ओठांच्या कडेनं खाली ओघळतं. ]

राजा : ( अतिशय घाबरून ) नाना....मी आलोच हं....

[ जिन्याकडे धूम ठोकतो. मोठमोठ्यानं ओरडत खाली येतो. ]

राजा : लक्ष्मण....बाळ...नानांना, बघा, काय झालंय्, ते !

[ लक्ष्मण आणि बाळ धावत येतात. ]

राजा : डुळे पडल्यासारखे झालेत नाना. चल, आधी त्यांना आत पलंगावर झोपवू या—( नानांना उचलून आत नेतात. बाळला ) हातपाय चोळ जरा त्यांचे.

बाळ : हो....( आत जातो. )

राजा : लक्ष्मण....धावत जा....आणि डॉक्टरना घेऊन ये....असाल, तस्से चला, म्हणावं.

[ लक्ष्मण घाईगर्दीनं बाहेर जातो. राजा वळतो, आणि वर जाऊ लागतो....तेवढ्यात आई कुठूनशी येते. ]

राजा : बरं झालं आलीस, आई, नानांना अटॅक आलाय्.

आई : तू कडेवरचा होतास ना, त्यावेळी असाच अटॅक आला होता त्यांना.

राजा : चल, येतेस ना त्यांच्याकडे ?

आई : मी तुला भेटायला आलेते.

राजा : या अशा घाईच्या वेळी ?

आई : ही शेवटची वेळ आहे. यानंतर पुन्हा कधी मी दिसायची नाही.

राजा : का ?

आई : तुझं बाळपण संपत आलंय्. आता तुझं जग वेगळं. त्यात मला जागा नाही.

राजा : आई....चंद्राक्का गेली ..मी घालवली तिला.

आई : मला एक सांग, राजा...तिच्या जागी मी असते....तुझी खरीखुरी आई....तरी तू मला घालवून दिलं असतंस ?

राजा : तिच्या जागी तू ?

आई : गडबडलास. मला घालवणं शक्य झालं नसतं तुला. लोकं बोलली असती, तरी. म्हंजे आपण आपल्या सोयीचं होईल, तसं वागतो. ज्याच्या हातांत सत्ता, तो न्याय करायला बसतो ! खरं, की नाही ? हे घर तिचं स्वतःचं नव्हतं, म्हणून तुम्ही तिला घालवू शकलात. नाहीतर चांगलं-वाईट ठरवायचं कुणी ?

राजा : पण, आई, नाना बरे होतील ना, ग ? ते नसले, तर आम्ही एकटे पडू—त्यांच्याशिवाय दुसरं कुणीच नाहीये, ग, आम्हांला....

[ आई नाहीशी झालेली. राजा विचारात खुर्चीवर बसतो. इतक्यात वरचा विजेचा दिवा अचानक लागतो. राजा वर पाहतो. मग उठून कंदील विझवतो. इतक्यात वरून बाळ खाली येतो. ]

बाळ : ( राजाला ) राजा.... एक सांगू ? रागवायचं नाही....

राजा : काय ?

बाळ : आपण चंद्राक्काला परत बोलावू या. तीच नानांकडे नीट लक्ष देईल. ती आली, तरच नानांना बरं वाटेल.

राजा : वेडा आहेस तू. चंद्राक्काला कसं आणणार परत ?

बाळ : ती अजून स्टेशनवर पोचली नसेल. मी सायकल घेऊन जातो. एकदम फास्ट मारतो. वाटेत गाठता आलं, तर पाहतो. ( थांबून ) विचार कसला करतोस ? सांग ना.... आणू चंद्राक्काला ?

राजा : कायतरीच तुझं. ती काय भेटणारेय् स्टेशनवर ? गाडी कधीच सुटली असेल !

[ दारात चंद्राक्का उभी. ]

बाळ : चंद्राक्का.... ( धावत जाऊन तिला मिठी मारतो. )

राजा : चंद्राक्का.... तू परत आलीस ?

चंद्राक्का : होय, माझ्या बाळांनो, माझ्यानं गाडीत चढवेचना. वाटलं, हे घर सोडून मी कुठं कुठं जाऊच शकणार नाही. तुम्ही मला कसंही वागवलंत, तरी मला इथंच राहायला हवं. त्यांच्या पायाची सेवा करताकरताच मरून जायला हवं.

राजा : बरं झालं, चंद्राक्का, तू आलीस ते. नानांना अर्धांगवायूचा झटका आलाय्.

चंद्राक्का : ( धक्का बसून ) म्हणतोस काय तू, राजा ?

राजा : होय, चंद्राक्का. नानांनी तुझा ध्यास घेतलाय्. तू गेलीस, म्हणून.... म्हणूनच ते असे लुळेपांगळे होऊन पडलेत. तूच त्यांचं अर्धांग होतीस !

चंद्राक्का : राजा !

राजा : माझं चुकलं, चंद्राक्का. मला तुझी किंमत कळली नाही. मी लोकांचं ऐकून तुला घर सोडायला लावलं... मला माफ कर, चंद्राक्का.... माफ कर ! ( तिचे पाय धरतो. )

[ काळोख. क्षणभरात पुन्हा उजेड होतो, तेव्हा राजा पहिल्यासारखाच विचारात उभा. आणि बाळ त्याला विचारतोय्.... ]

बाळ : विचार कसला करतोस ? सांग ना.... आणू चंद्राक्काला ?

राजा : कायतरीच तुझं ! ती काय भेटणारेय् स्टेशनवर ? गाडी कधीच सुटली असेल. आणि सुटली, न सुटली.... आपण आता चंद्राक्काला परत बोलवायचं नाही. कधीच. मग काहीही होवो !

बाळ : का पण ?

राजा : तुला समजत कसं नाही, बाळ ? तिला इथनं घालवून आपण तिचा अपमान केलाय् .... पण परत बोलावलं, तर तिचा त्याहूनही अधिक मोठा अपमान होईल ! बाळ, चंद्राक्का म्हंजे काही कुत्रं–मांजर नाही, की आपण तिला घालवून द्यावं, आणि आपल्या गरजेसाठी 'यूंयूं' करून परत बोलवावं !.... ती माणूस आहे ! तिला काही किंमत आहे ! स्वाभिमान आहे ! मी नाही तिला परत बोलावणार ! आपल्याला तिची कितीही गरज असली, तरी ! तिनं परत यावं.... असं आपल्याला... कितीही वाटलं, तरी !

बाळ : (चकित.) एकदम किती.... मोठ्या माणसासारखं बोलायला लागलास तू, राजा !

[ ते असे बोलत असतानाच राजाभाऊ येऊन उभे. त्यांच्यावर प्रकाशझोत. ]

राजाभाऊ : वेल्, त्या दिवशीच मी एकाएकी मोठा झालो. चंद्राक्का निघून गेली. त्यानंतर दोनच दिवसांनी नाना आम्हांला सोडून गेले, तेही तिच्यासारखेच, मुकाट्यानं. शेवटपर्यंत ते काहीच बोलू शकले नाहीत. पण अजून मनात येतं.... चंद्राक्का, नाना, मी.... आम्ही तिघेही वागलो, ते– बरोबर होतं, की चूक ? नीतीच्या ढोबळ कल्पनांनी मी त्या दोघांना उगाच छळलं का ? मला तो अधिकार होता का ? पण या प्रश्नांची उत्तरं आता कधीच मिळायची नाहीत. प्रश्न फक्त शिल्लक राहतील.... या खुर्चीसारखे, या वाड्यासारखे.... ते कायम राहतील.... निदान माझ्या अंतापर्यंत...

[ खुर्चीत बसून सिगार ओढू लागतात.
प्रकाश मंदावत जाऊन हळूहळू काळोख होतो. ]

**प ड दा**

■ संपूर्ण नाटक अत्यंत बांधेसूद व वेगवान आहे. प्रत्येक प्रसंग हा आवश्यकच आहे. संवाद अर्थपूर्ण आणि नाटकाची कथा पुढे सरकवणारे आहेत. वेळप्रसंगी ते नाट्यपूर्णहोतात; पण नाटकी कधीच होत नाहीत, हे मतकरींचे यश !

—माणूस

■ संपूर्ण नाटकच एका तणावपूर्ण लयीत चढत भिनत जाणारे: आहे... त्या अर्थाने हे नाटक प्रौढ प्रेक्षकालाच पेलेल असे आहे. मराठी प्रेक्षकाची पौगंडावस्था सरली आहे किंवा नाही, हेच या नाटकाने सिद्ध होईल. प्रेक्षकांनी आपली पौगंडावस्था संपविण्याचा एक जालीम उपाय म्हणून आग्रहाने हे नाटक पाहायला हवे.

—मुंबई सकाळ

■ ‘ विषया ’चे खोल खोल दर्शन घडविणारे नाटक

—लोकसत्ता

● Thc basic theme is the process of initiation... Never was this theme so delicately, tenderly and maturely handled on the Marathi stage !

—Sunday Observer

● कथा, कादंबरीपेक्षा नाटकातून हे नाजूक भावबंध आविष्कारित करणे तर जवळजवळ असाध्यच. पण हे असाध्य, अप्राप्य ते श्री. रत्नाकर मतकरी यांनी साध्य करून दाखवलंय्. केवळ साध्यच केलं नाही, तर ते परिणामकारक आणि यशस्वी केलं आहे.... विषय त्याच्या बारीकसारीक तपशीलासकट समर्थपणे, खोलात जाऊन, अत्यंत वास्तवपणे आणि आवश्यक तितक्या नाजूकपणे हाताळला आहे.

—सोबत

● मुलांचा व मोठ्यांचा ‘ नाजूक ’ संघर्ष रंगविणारे ‘ खोल.... खोल पाणी ’

—महाराष्ट्र टाइम्स

IRBK-0120594

IRBK-0120594

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 20484 नों. दि. 2/99/68
वि. नाटक क्र.